९८६७
म. ग्रं. सं. ठाणें
विषय भूप्रवास
सं. क्र. ४६९



# कमंडची यात्रा

REFBK-0017217
FBK-0017217

कमला फडके

मराठी ग्रंथ संग्रहालय

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रंथालय
संमृद्ध यो

'त्रिवंद्रमची सफर !'
या गाजलेल्या पुस्तकाच्या लेखिका
सौ. कमला फडके
यांचे नवे प्रवासवर्णन

REFBK-0017217

REFBK-0017217

# 'उटकमंडची यात्रा'

कुलकर्णी ग्रंथागार, पुणे २

मूल्य अडीच रुपये

प्रकाशक :
पंडित अनंत कुलकर्णी
कुलकर्णी ग्रंथागार,
१८६ शनवार पुणे २

प्रथमावृत्ती १९६७


© सौ. कमला फडके, १९६७

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ, पुणे २.

वृंदावनची जादू ... १
"सा रम्या नगरी", म्हैसूर ... २६
निलगिरीची राणी उटी, ... ५१



श्रीरंगपट्टण
मंदिराचे
गोपुर




बंगलोर
लालबाग



उटी
साऊथ लेक



कोल्हुटी
धबधबा




शृंगेरी मंदिर ↑



तोडा लोकांचे मंदिर

मालकोट येथील मंदिर






चामुंडी टेकडीवरील महिषासुर



चामुंडी टेकडीवरील नंदी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
शा. क्र. ..........
शाखा

# १

## ‘ वृंदावनची जादू ’

क्षणभर मला वाटलं, मला हा सारा भास होतो आहे ! हे सारं स्वप्न आहे ! परंतु पुन्हा मनात आलं, ते स्वप्न तरी कसं म्हणावं ? कारण ज्या विलक्षण नयनमनोहर दृश्याकडे बघून माझं भान हरपलं होतं ते मी जागेपणी बघत होते यात संशय नव्हता. किंबहुना, दुपारी साडेचार वाजल्यापासून जवळजवळ अडीच तास याच क्षणाची वाट मी पाहिली होती. दुपारची उन्हं टळली, पश्चिमेकडचा गुलाबी रंग हवेत मिसळला, डाव्या बाजूला आठ हजार सहाशेसाठ फूट लांबी आणि एकशेचाळीस फूट उंच धरणाच्या प्रचंड भिंतीआड अस्वस्थपणे हेलावत असलेल्या कृष्ण-राज सागरावरून वाहणाऱ्या वाऱ्याच्या थंड झुळका अंगावर शहारे उभे करू लागल्या. तेव्हा माझी अधीरता अधिकच वाढली होती. पडदा उघडण्यापूर्वी मोक्याची जागा धरून बसणाऱ्या

प्रेक्षकांप्रमाणे आम्ही अशी मोक्याची जागा धरून बसलों होतो की जेव्हा कुणी यांत्रिक जादूगार बटन दाबील आणि समोर पसरलेल्या विशाल उपवनात विद्युत्‌दीपांचा झगमगाट उडेल तो क्षण दृष्टीतून सुटू नये.

आमची नजर वरचेवर मनगटावरच्या घड्याळाकडे जात होती. हळूहळू संध्याकाळच्या छाया इतक्या दाट झाल्या की घड्याळाचे काटे दिसेनात. आम्ही अस्वस्थ झालो. ती डिसेंबरची तीन तारीख होती. रविवार होता. परंतु काही यांत्रिक बिघाड होऊन आमची निराशा तर होणार नव्हती ? आमच्या आजूबाजूला शेकडो स्त्री-पुरुष आमच्यासारखेच खोळंबले होते. वृन्दावन गार्डन्सच्या प्रवेशद्वाराच्या भव्य कमानीच्या पहिल्या पायरीवर आम्ही बसलो होतो. आणि तेथून तीस-चाळीस निमुळत्या, उंच पायऱ्या खाली उद्यानाच्या पहिल्या टप्प्यापर्यंत गेल्या होत्या. या पायऱ्यांवरून तर माणसांचा अखंड प्रवाहच वाहत होता, खालच्या टप्प्यावर रेंगाळत होता आणि मग निरनिराळ्या वाटिकांच्या दिशेनं फुटत होता. डावीकडे पसरलेल्या धरणाच्या प्रचंड भिंतीमुळे वातावरणात अंधार अधिकच दाटल्यासारखा झाला. पायऱ्यांवरून खाली जाणारा माणसांचा प्रवाह तर आता काळोखात दिसेनासा झाला. न दिसणाऱ्या पाण्याचा फक्त खळखळाट ऐकू यावा तसा उद्यानात घोळक्या-घोळक्यांनी फिरणाऱ्या माणसांचा रव ऐकू येत होता. वाढत्या अंधारात एक विलक्षण भीतीही मनात डोकावत होती.

दुपारी चाराच्या सुमाराला आम्ही बंगलोरहून अठ्ठ्याहत्तर मैलांचा प्रवास करून वृंदावनला पोचलो आणि आमची मोटार धरणाच्या भिंतीवरच्या चौदा फूट रुंदीच्या रस्त्यावरून जाऊ

लागली. त्या वेळेस माझा जीव मी मुठीत घेतला होता. एकशे-चाळीस फूट उंच आणि सव्वा मैल लांबीचं हे धरण होतं. डाव्या बाजूला पन्नास चौरस मैल पसरलेला आणि कित्येक कोटी घनफूट जलसंचय असलेला कृष्णराजसागर तलाव पिंजऱ्यात कोंडलेल्या हिंस्र वनराजाप्रमाणे अस्वस्थपणे हेलावत होता. उजव्या बाजूला धरणाच्या भिंतीखाली वृंदावन गार्डन्सचा देखावा दिसत होता. पण तिकडे पाहण्याइतका मोकळेपणा मनाला वाटत नव्हता. धरणाची भिंत ओलांडणं म्हणजे तारेवरची कसरत असं भय वाटत होतं. त्यातून रस्ता अरुंद ! पुढून एखादं वाहन–विशेषतः बलगाडी आली की, मोटार मागं न्यावी लागे, वाहनांना बाजू देण्यासाठी वाढविलेल्या अर्धवर्तुळाकृती गॅलरीत थांबवून अडथळा दूर होताच पुन्हा पुढे न्यावी लागे. मोटारीचा वेग दहा-पंधरा मैल एवढाच ठेवलेला असला तरी कृष्णराजसागरावरून घुसणारा वारा मोटारीवर सपसप चाबूक ओढल्यासारखा आवाज करी. धरणावरचा अरुंद रस्ता ओलांडून आम्ही कावेरीच्या उत्तर तीरावर पोचलो तेव्हा मी सुटकेचा निःश्वास टाकला.

आता कातरवेळी वृंदावन गार्डन्सच्या प्रवेशद्वारापुढच्या पायरीवर बसल्याबसल्या कृष्णराजसागराचं ते रौद्र स्वरूप आठवलं. धरणाच्या सोडलेल्या मोऱ्यांतून चवताळलेल्या हिंस्र पशुप्रमाणं मुसंड्या देत बाहेर पडणाऱ्या जलौघाचा, दोन घटकांपूर्वी पाहिलेला तो उन्माद आठवला. दुपारच्या उन्हात धरणाच्या भिंती झिरपताना दिसल्या होत्या. ती आठवण झाली, आणि भीती वाटू लागली की, ही भिंत पुण्याच्या पानशेत धरणाच्या भिंतीसारखी खचली आणि कृष्णराजसागराची राक्षसी शक्ती मोकाट सुटली तर केवढा जलप्रलय उडेल !

इतक्यात जिकडे तिकडे एकदम लखलखाट झाला ! कुणी जादूगार यांत्रिकानं कळ दाबली आणि काळोखाचा पडदा क्षणात दूर होऊन स्वर्गीय सौंदर्याचं भांडार दृष्टीसमोर खुलं झालं. त्या क्षणी डोळे दिपले आणि सगळ्यांच्या तोंडून एकच उत्स्फूर्त उद्गार निघाला, " अहाहा ! " झगमगणाऱ्या प्रकाशतंतूंची वस्त्रं नेसलेल्या, तेजकणांचे अलंकार ल्यालेल्या बहुरंगी जलधारांचं अवर्णनीय नृत्य डोळ्यांपुढे दिसू लागलं. क्षणभर मला वाटलं, मला हा सारा भास होतो आहे, हे सारं स्वप्न आहे !

पण स्वप्न तरी कसं म्हणावं ? डोळे तृप्त होत होते आणि त्यांची तृप्ती मला स्पष्ट कळत होती. आम्ही जिथे बसलो होतो, त्या दक्षिण तीरापासून उत्तर तीरापर्यंत जवळजवळ अर्धा मैल विस्ताराचं उद्यान माझ्या दृष्टीसमोर पसरलं होतं. जिकडे तिकडे जणू दिवाळीची रोषणाई झगमगत होती. उंच उंच कारंजांचे भुईनळे उडत होते. भुईचक्रं फिरत होती. उंच खांबावर सर्रकन उलगडणाऱ्या आणि मिटणाऱ्या नक्षीची सुदर्शन चक्रं फिरत होती. कापलेली डेरेदार झाडं ' ख्रिसमस ट्री ' प्रमाणं विजेच्या हिऱ्यामाणकांनी नुसती लगडली होती. हिरव्या कुंपणांत विजेचे साप सळसळत होते. फुलझाडांची नक्षी काढलेले, पुष्करिणीच्या चकचकणाऱ्या काचा बसवलेले हिरवळीचे हिरवेगार गालिचे पसरले होते. काही चौकोनी, काही लंबवर्तुळाकार !

आम्ही ज्या ठिकाणी बसलो होतो ते ठिकाण धरणाच्या भिंतीच्या पातळीवर होतं. एवढ्या उंचीवरून खाली नदीच्या पात्रापर्यंत टप्प्याटप्प्यानं बागेची रचना केली होती. प्रत्येक टप्प्यावरून खालच्या बगीचात कृत्रिम धबधबे सोडले होते आणि तऱ्हेतऱ्हेच्या आकाराच्या उथळ पुष्करिणींतून शेकडो कारंजी

उसळत होती. जलधारांचं नृत्य चालू होतं. कारंजांचे तरी किती प्रकार ! पाण्याच्या पृष्ठभागावर लहानशा फुलाप्रमाणं उमलणाऱ्या चिमुकल्या कारंजांपासून सुरूच्या झाडाप्रमाणं धारांचे फवारे फेकणाऱ्या उंच कारंजांपर्यंत उंचीच्या तऱ्हा होत्या. आकारांची विविधता तर अशी कुठेच पाहायला मिळायची नाही. काही कारंजी एका रांगेत स्वतःभोवती अशी फिरत होती की जणू घागरा घातलेल्या अप्सरा नृत्यातील गिरक्या घेत आहेत. एका रांगेत तर एकमेकींचे हात धरून नृत्यांगना धनुष्याकृती उभ्या असाव्यात तशा कारंजांच्या धारा एकमेकीत मिसळत होत्या. कुठे या बाजूंनी चार, त्या बाजूंनी चार अशा वक्रधारा हवेत एकमेकांत मिसळून अर्धवर्तुळ पूर्ण करीत होत्या. कुठे पुष्करिणीच्या काठानं ओळीनं उडणाऱ्या धारा वक्राकृती झेप घेऊन मध्यबिंदूवर एक होऊन त्यांची धार खालच्या पाण्यात डौलानं सांडत होती. एके ठिकाणी एकूण अठ्ठ्याऐंशी फवाऱ्यांतून बाहेर पडणाऱ्या धारा गोल गतीनं मध्यबिंदूवर एकमेकींत मिसळत होत्या आणि त्या सर्वांची मिळून भली मोठी छत्री झाली होती. या कारंजांचं नावच मुळी, अंब्रेला फाऊंटन !

हे जलधारांचं समूह नृत्य टेक्निकलरमध्ये असल्यामुळं तर साऱ्या वातावरणात अनेक रंगांची उधळण चालू होती. पाण्याच्या पृष्ठभागाखाली कारंजांच्या नळीच्या तोंडाशी निळ्या, तांबड्या, पिवळ्या, हिरव्या रंगांचे मोठमोठे विद्युतदीप ठेवले असल्यामुळं अनेकविध रंगछटांनी पाणी नटलेलं होतं. उद्यानाच्या वरच्या टप्प्यावरून खाली कोसळणाऱ्या कृत्रिम धबधब्याकडे पाहिलं की वाटे, भरजरी, निळी पैठणी खाली सोडली आहे. कधी निळ्या, कधी गुलाबी तर कधी हिरव्या रंगांत उसळणाऱ्या सुरूच्या

झाडाएवढ्या उंच कारंजांकडे पाहत राहिलं की पाण्याची घनता नाहीशी होऊन रंगीबेरंगी तेजाचीच रेषावलयं उसळत आहेत, असा विलक्षण भास होई. अशी ही अपूर्व शोभा जवळजवळ अर्धा मैल पसरलेली होती.

या स्वप्नरम्य दृश्याची शोभा डोळे भरून पाहण्यासाठी केवळ भारतातूनच काय, पण जगाच्या कानाकोपऱ्यातून नाना देशांचे, नाना पोषाखातले शेकडो स्त्री-पुरुष रात्रीच्या त्या पहिल्या प्रहरी वृंदावन गार्डन्सच्या वाटिकांत विहार करीत होते, थबकत होते, बोलत हसत होते. त्यांच्या बोलण्या-हसण्याचा आणि असंख्य जलधारांच्या नृत्याचा आवाज सोडला तर बाकी सारं स्तब्ध होतं ! अगदी स्तब्ध ! आणि त्यामुळंच भास होण्यासारखा होता की हे सारं स्वप्न आहे.

वृंदावन उद्यानाची शोभा काही वेगळीच. या सौंदर्याची जातच वेगळी. काश्मीरमधल्या शालीमार, निशात बागा मी पाहिल्या होत्या. त्या उद्यानांची रचनाही अशीच मजल्यामजल्यांची होती. तिथंही अशीच कारंजी वाहत होती. परंतु तिथं अशी विजेची रोषणाई नव्हती. रंगीबेरंगी रोषणाई हे वृंदावन गार्डन्सचं वैशिष्टय आहे. कावेरीला अडवून कृष्णराजसागर नावाचा प्रचंड तलाव ज्यांनी बांधला त्या भारतरत्न विश्वेश्वरअय्यांच्या कलादृष्टीचा व कल्पकतेचा हा विलास आहे. सव्वा मैल लांब प्रचंड भिंतीआड कोंडलेल्या पाण्याच्या दाबानं धरणाच्या अलीकडील बाजूला आठ-नऊशे यार्ड विस्ताराच्या उद्यानातील शेकडो कारंजी उसळत राहावीत, अशी चातुर्याची योजना केली आहे. ही सारी कारंजी चोवीस तास अखंड वाहत असतात, पण त्यांची खरी शोभा आठवड्यातून तीन रात्री जेव्हा दिवे

लागतात आणि कारंजांच्या धारांना नाना रंग छटांचे अलंकार चढतात तेव्हा पाहावी. हे सौंदर्य निसर्गाचं नाही; मनुष्यकृत आहे. काश्मीरमधील खिलनमर्गच्या पर्वत-शिखरावर अकरा हजार फुटांच्या उंचीवरून निसर्गाचं जे स्वरूप मी बघितलं होतं, त्यात रुद्रता होती, भव्यता होती. पहेलगामच्या परिसरात उभं राहिल्यावर जे सौंदर्य मला दिसलं होतं, त्यातही जितकी मनाला झपाटणारी विलक्षण स्तब्धता होती, तितकीच भव्यता होती. अलाहाबादला गंगायमुनांच्या संगमात स्नान करताना त्या दोन नद्यांच्या मीलनाचा जो प्रचंड कल्लोळ मी बघितला होता, त्याची शोभाही भव्य होती, विराट होती. . . वृंदावन गार्डन्सच्या सौंदर्याची तऱ्हा वेगळीच! हे सौंदर्य विराट नाही, पण स्वर्गीय खचित आहे. मृदू, मुलायम, रेखीव आहे. इंद्रियांच्या आणि अंतःकरणाच्या तृप्तीबरोबरच एक प्रकारची अतृप्ती निर्माण करण्याचा जो गुण सगळ्या सौंदर्याच्या ठिकाणी असतो, तो या सौंदर्यात आहे.

जवळजवळ दोन तास आम्ही हिंडत होतो. जागोजागी थांबत होतो. आता आम्ही उद्यानाच्या दुसऱ्या टोकाशी उभे होतो. आम्ही ज्या कमानीपुढच्या पायरीवर प्रथम बसलो होतो, ती पायरी इथून अर्धा मैल दूर होती. कमानीपलीकडच्या पटांगणात सुदर्शन चक्रासारखा फिरणारा रशियन कारंजा इथून दिसत नव्हता. परंतु आम्ही कठड्याला टेकून उभे होतो तेथून पलीकडे खाली नदीच्या पात्रातला तलाव दिसत होता. वृंदावन गार्डन्सच्या दक्षिण बाजूचं सारं पाणी आपल्या सोंडेनं दोन हत्ती या तलावात फेकीत होते. कुणी हौशी प्रवासी तलावात बोट वल्हवीत होता. तलावाच्या मध्यभागी दीपमाळेसारखा एकच प्रचंड कारंजा उंच

उसळत होता. स्वर्गारोहण करण्यासाठी झेप घेतलेल्या उर्वशीचा केशसंभार वाऱ्यावर उडावा तसा त्या कारंजाच्या तुषारांचा विरळ पडदा हवेत झुलत होता. आणि पलीकडच्या तीरावर वृंदावन गार्डन्सचा उत्तर भाग सुरू झाला होता. आम्ही परत वळलो. धरणाच्या भिंतीच्या पातळीवरची कृष्णराजसागर हॉटेलची भव्य इमारत इथून दिसत होती. तेथे स्टुअर्डचं—म्हणजेच यजमानाचं—काम करणाऱ्या इटालियन बॅस्टिअननं जेवणाच्या वेळेस परत या असं बजावून सांगितलं होतं. त्याचीही आठवण होत होती. म्हैसूरहून केवळ वृंदावनच्या सहलीवर आलेले असंख्य स्त्री-पुरुष आता घाईघाईने निघाले होते. त्यांना भाडोत्री वाहनं गाठावयाची होती. परंतु आमची पावलं मात्र त्या स्वर्गीय स्थळीच रेंगाळू लागली. आम्ही जागोजागी थांबत होतो. कारंजांची रंगीत क्रीडा बघत होतो. हिरवळीच्या गालिचावर बसून फवाऱ्यांच्या दुषारांनी अंगं भिजवून घेता घेता बोलत होतो. मी आप्पांना सांगत होते, "या ठिकाणीच 'झनक झनक पायल बाजे' या चित्रपटातलं संध्या आणि गोपीकृष्ण यांच्या नृत्याचं शांतारामबापूंनी शूटिंग घेतलं. आठवतं तुम्हांला ? नयन सो नयन, गाणं ?" आप्पा म्हणाले, "या बागेचं सौंदर्य अपूर्व तर खरंच. परंतु या सौंदर्याचा उपयोग चित्रपटात करून घेणं येरा गबाळाचं काम नाही. ते धाडस एक शांतारामच यशस्वी रीतीने करू जाणे ! " अशा प्रकारे दोन तास केव्हाच निघून गेले होते. वृंदावनची शोभा अगदी पोटभर पाहिली होती. तरीही वाटत होतं आणखी पाहावं. हे लोकोत्तर सौंदर्य चित्तात आणखी साठवावं. इथून हलूच नये !

वृंदावन गार्डन्सचा शेवटला टप्पा चढून आल्यावर दमल्याचं

निमित्त काढून आम्ही आमच्या पूर्वीच्या जागी पायरीवर बसलो. परंतु दमल्याची केवळ सबब होती. खरं कारण, त्या सुंदर वातावरणाबाहेर आमचा पाय निघत नव्हता. समोरची ती रंगीबेरंगी हसरी, नाचरी शोभा डोळ्यांत शक्य तितकी भरून घेता घेता मी आप्पांना म्हटलं, " चार दिवसांपूर्वी आपण होतो कुठं आणि आज आहो कुठं ! "

कोणताही कार्यक्रम ठरल्याप्रमाणं पार पडला की, आप्पा विशेष खूष असतात. आताही ते मोठ्या अभिमानानं माझ्याकडे वळून म्हणाले, " रविवारी तीन तारखेला रात्री आपण वृंदावन गार्डन्समध्ये असू, असं मी तुला सांगत होतो ते खरं ठरलं की नाही सांग ! "

" कबूल, एकदम कबूल ! " मी म्हणून टाकलं. आपला व्यवस्थितपणा मला ते नेहमी असा टिच्चून सांगत असतात—त्यापासून मी बोध घ्यावा म्हणून !

बंगलोर, म्हैसूर, उटकमंड अशा प्रवासाला जायचं ठरल्यापासून आप्पांनी नेहमीप्रमाणं नकाशा आणि रेल्वेचं टाइमटेबल बाहेर काढलं होतं. वेळ सापडला की तांबडया पेन्सिलीच्या खुणा या दोन्ही कागदांवर ते करीत होते. पुण्याच्या ' ट्रेड आणि ट्रॅव्हल सर्व्हिस ' चे श्री. पाटणकर यांना फोन करण्याचा आणि बंगलोरच्या ' राममोहन ' या जागतिक कीर्तीच्या प्रवासी कंपनीचे श्री. बेटय्या यांना पत्रं धाडण्याचा धडाका त्यांनी लावला होता. अखेर २९ डिसेंबर हा प्रवासाला निघण्याचा दिवस उजाडला. तेव्हा आमच्या पंधरा दिवसांच्या प्रवासाच्या स्थळ-काळाच्या तपशिलासह केलेल्या यादीच्या त्यांनी दोन नकला केल्या. एक स्वतःजवळ ठेवली आणि दुसरी आमच्या रोहिणीच्या ताब्यात

दिली. कुठल्याही दूरच्या प्रवासाचा बेत करायचा झाला की, आप्पांची एक रीत ठरलेली आहे. काय काय पाहायचं ते ते पक्कं ठरवितात आणि कोणती स्थळं वगळायची त्यांचाही निश्चय करतात. त्याला कारण असं, की आपण दूरच्या प्रवासाचा बेत केला की 'जाताच आहा तर अमूक पाहा, तमूक पाहा,' असा सल्ला मित्रमंडळी देऊ लागतात. अमुक स्थळ बघितलं नाही तर तुमची यात्रा अपुरी होईल, असंदेखील सांगितल्यावाचून ते राहत नाहीत. त्यांचा हेतू चांगलाच असतो. आणि माझं मन जात्या असं चंचल की मी आप्पांना म्हणू लागते, 'जातोच आहो तर बघू या की हे सारं.' या वेळीदेखील असंच झालं! कुणी सांगितलं, 'बेलूर बघायला हवं तुम्ही.' कुणी म्हणाले, 'गेरसप्पाचा धबधबा नाहीच का पाहणार तुम्ही? हात्तीच्या!' माझं मन द्विधा होऊ लागतं. परंतु आप्पांचं खंबीर असल्यामुळं आपल्या आराखडयात ते फेरफार करीत नाहीत.

डिसेंबरच्या २९ तारखेला पूना–बंगलोर मेलनं रात्री दहा वाजता आम्ही पुणे स्टेशन सोडलं. आमच्या तिन्ही मुलांनी 'मजेत प्रवास करा' असा हसून आम्हांला निरोप दिला खरा, परंतु त्यांचे हसरे चेहरे दिसेनासे होताच मला एकदम बेचैन वाटू लागलं. मी खिडकीबाहेर पाहतच बसून राहिले. खिडकीबाहेर पाहण्यासारखं काही नव्हतंच. चांदणं बेताचंच होतं. अंधार दाटत चालला होता. खिडकीबाहेर पळणारी झाडंझुडपं घोंगडयाचा बुरखा घेऊन धावणाऱ्या माणसाप्रमाणं दिसत. एखाद्या दिव्याचा स्पॉट-लाईट पडला की तेवढ्या भागातली झोपडी उठून दिसे. बाकी सारा काळोख!

गाडीनं जसजशी बारीक बारीक स्टेशनं मागं टाकली, नेटानं

बंगलोरचा मार्ग धरला तसा तिच्या वेगाचा आडदांडपणा वाढू लागला. आमचे बर्थ भलतेच हिंदकळू लागले आणि बोलणं किंवा वर्तमानपत्र उघडून वाचणं अशक्य होऊन बसलं. कधी आम्हांला वाटे, आपल्याला चाळणीत घालून कुणी चाळीत आहे, तर कधी वाटे, औषधाच्या बाटलीत घालून कुणी आपल्याला हालवीत आहे. वाहनानं अशी दांडगाई चालू केली की उत्तम उपाय म्हणजे त्याला विरोध न करणं ! आम्ही तोच मार्ग पत्करला आणि सकाळी सात वाजता घटप्रभा स्टेशनवर आमचे प्रिय मित्र शंकरराव किर्लोस्कर येणार होते, त्या वेळी उठून तयार राहण्याविषयी एकमेकांना बजावत आम्ही झोपी गेलो.

सकाळी घटप्रभा स्टेशनावर गाडी थांबली. डब्याचं दार उघडून आम्ही स्टेशनच्या दिशेनं पाहू लागलो, तोच एखाद्या क्रिकेटरप्रमाणं लांब लांब टांगा टाकीत, हसत शंकरराव आमच्याच दिशेनं येत होते. त्यांनी नोकराकरवी चहा आणला होता. भाजलेल्या शेंगा आणि फोडणीचे चुरमुरे आणले होते, पण चहा आणि गप्पा संपण्यापूर्वीच गाडी हलली. आम्ही घाईनं चहा पिऊ लागलो तसं ते म्हणाले, “ सावकाश प्या. गाडी आपलीच आहे. इथले सारे लोक आपलेच आहेत. ” परकी लोकांना आपलंसं करून घेण्यातच शं. वा. कीं. च्या यशस्वी जीवनाची गुरुकिल्ली असावी. कर्नाटकात राहायला लागल्यापासून ते कानडी लिहावाचायला शिकले. कानडीतून व्याख्यानही देऊ लागले आहेत, पण गाडी अखेर सुटलीच आणि ते खाली उतरले तेव्हा किती तरी गोष्टी बोलायच्या राहून गेल्या !

साडेदहा वाजता गाडी बेळगाव स्टेशनात शिरली आणि आमची आक्का इंदिरा संत भेटली तेव्हाही हाच अनुभव आला.

तिनं आणि सौ. शालिनी सोमण यांनी मिठाई आणि चिकूची करंडी दिली. " प्रवास कसा झाला ? " शंकररावांप्रमाणं तिनंही विचारलं आणि 'झक्कपैकी गाढवावर बसून आल्यासारखा झाला,' असं वर्णन आम्ही तिला पुन्हा ऐकवलं. गाडीनं बेळगाव सोडलं आणि बोटीला किनारा दिसेनासा व्हावा तसं मला वाटलं. कारण आता पुढच्या प्रवासात कुणी आपली माणसं भेटणार नव्हती. आता आम्हांला वेध लागले होते बंगलोरचे.

दुसऱ्या दिवशी सकाळी बंगलोर स्टेशनात गाडी शिरली तेव्हा आम्ही अगदी तयारीतच होतो. स्टेशनाच्या आवाराबाहेरून आमची टॅक्सी वुडलँडस हॉटेलच्या रस्त्यानं निघाली. पहाटेच्या थंड वाऱ्याच्या झुळका अंगाला येऊन बिलगल्या. बंगलोरचं हे पहिलं स्वागत मी कधीच विसरणार नाही. पहिलं दर्शनही विसरणार नाही. रुंद, प्रशस्त राज रस्ता, मधूनमधून डुलणारे वृक्ष, दोन्ही बाजूंना बगीच्यांच्या कोंदणात बसविलेल्या नीटनेटक्या बंगल्या, प्रशस्त चौक, चौकांची भव्यता वाढविणाऱ्या बादशाही इमारती आणि लतावेलींनी सुशोभित दिसणारं पार्क हे या शहराचं दर्शन किती सुंदर, नीटनेटकं आणि निर्मळ होतं. सुंदर काचपात्रात सोनेरी, शीतल, उत्तेजक पेय भरावं तशी हवाही मोठी उत्तेजक होती. या हवेचे जितके घोट घ्यावे, तितकी तृष्णा वाढतच जाई. दहा पंधरा- मिनिटांतच आमची टॅक्सी वुडलँडसच्या आवारात शिरली.एखाद्या इस्पितळाचा किंवा विश्वविद्यालयाचा पसारा असावा तसा या वुडलँडस हॉटेलचा पसारा आहे. एलिझाबेथ राणीनं वुडलँडस्च्या मद्रास येथील शाखेला भेट द्यावी इतकी या हॉटेलची प्रतिष्ठा मोठी आहे. हॉटेलच्या मुख्य इमारती, कचेऱ्या, जेवणाचे

अनेक प्रशस्त हॉल्स आहेत आणि आजूबाजूच्या काही दुमजली तर काही बैठ्या इमारतींत राहण्याची सोय आहे. आमच्यासाठी रिझर्व्ह केलेली जागा पाहून प्रथम मला धक्काच बसला. ही 'डबलरूम' म्हणजे एक बंगलाच होता! बैठकीची सुसज्ज खोली, एक बेडरूम, त्या लगत ड्रेसिंगरूमला जोडलेली मोठ्या हॉलएवढी बाथरूम आणि बाजूला छोटीशी डायनिंग रूम एवढा पाच खोल्यांचा ब्लॉक मला एकदम पसंत पडला खरा; पण माझ्या मनात शंका येऊन विचारलं, "ही आमच्यासाठी राखून ठेवलेली जागा आहे? काही चूक तर होत नाही ना?" कारकुनानं पुढं ठेवलेल्या रजिस्टरवर सही करण्यापूर्वी मी आणखी एक शंका फेडून घेतली. ती म्हणजे रोज माणशी काय चार्ज आकारला जाईल. तो म्हणाला, 'माणशी पंधरा रुपये.' म्हणजे तीस रुपयांत एक चिमुकला बंगलाच आम्हांला मिळाला होता. शिवाय टेलिफोन, गरम पाण्याची सोय आणि रामकृष्णन् नावाचा एक सुस्वभावी, नीटनेटका नोकर दिमतीला!

थोड्या वेळानं कॉफी आली. ब्रेकफास्ट आला आणि ठरल्या वेळी बेटय्याही भेटायला आले. बेटय्या म्हणजे चांगले साडेपाच फूट उंच, काळे, लठ्ठ, तपकिरी सूट घातलेले असे असतील, असा माझा अंदाज होता. पण पाहते तो पुण्याच्या एस. पी. कॉलेजातल्या स्कॉलर विद्यार्थ्यासारखी त्यांची पॉकेट एडिशन! आल्याबरोबर त्यांनी आपली फाईल काढली. आप्पांनीही काढली. तेव्हा मी तेथून उठलेच. पण आतल्या खोलीत पलंगावर पडल्या पडल्या त्या दोघांचं संभाषण ऐकून माझी खूपच करमणूक होत होती. असा योजनाबद्ध प्रवास ऐषआरामाचा होतो हे खरं असलं तरी त्यात 'स्पिरिट ऑफ ॲडव्हेंचर' उरत नाही, अशी माझी शंका

आहे. ‘ कुणा एकाची भ्रमण गाथा ’ या पुस्तकाच्या लेखका-प्रमाणं ‘ मनात आलो, निघालो ’ असा प्रवास एकदा करून पाह्यला पाहिजे, असे डोहाळेही सुचले. बेटय्यांनी पुढच्या प्रवा-साची, ‘इटिनररी’ आप्पांच्या स्वाधीन केली. तेव्हा त्यांना निरोप देण्यासाठी मीही बाहेर आले. मी आप्पांना ‘ रसमंजिरी ’ च्या तिकिटांची आठवण केली.

“ मिस्टर बेटय्या ! ” आप्पा म्हणाले, “ आज संध्याकाळी इथल्या टाऊन हॉलमध्ये सिनेमा नटनटचांचा कार्यक्रम आहे, त्याची तिकिटं मिळतील काय ? ”

बेटय्यांच्या डिक्शनरीत अशक्य हा शब्दच नसावा. किंचित विचार करून ते म्हणाले, “ आपण सगळे मिळून टॉऊन हॉलवर जाऊ. मी तिकिटांची व्यवस्था करीन. मला ऑफिसवर सोडा. मग तुम्ही पाहिजे तर लालबाग पाहा किंवा बाजारात जा—”

“ पण. . . ” आप्पांनी वाहनाची शंका काढली.

“ तुमची मोटार बाहेर तयार आहे. ”

“ असं ? ” आम्ही एकदम विचारलं.

आम्ही बाहेर येऊन पाहतो तो एक नवी कोरी अँबॅसडर गाडी दारात उभी होती, आणि शेजारी पांढऱ्या गणवेषातला ड्रायव्हर. डबलरूम म्हणजे बंगला आणि भाडचाची टॅक्सी म्हणजे कोरी अँबॅसडर हे बंगलूरी गणित व्यस्त वाटण्यासारखं होतं खरं ! मग बेटय्यांनी खुलासा केला की, “ म्हैसूर सरकारनं प्रवाशांच्या सोयीसाठी काही निवडक टूरिस्ट गाडचा राखून ठेवल्या आहेत. त्यांपैकी ही एक गाडी. आता या गाडीतून तुम्ही वृंदावन, म्हैसूर, उटकमंड सगळा प्रवास करायचा—”

“ फर्स्ट क्लास ! ” आप्पा उद्‌गारले. मग त्यांनी ड्रायव्हरला

विचारलं, "नाव काय तुझं ?" तो तमिळ भाषिक प्रथम गोंधळला, मग अदमासानं म्हणाला, "नारायण."

"चला नारायणराव !" आप्पांनी हंसत हुकूम सोडला. मोटार एक डौलदार वळण घेऊन वुडलँड्सच्या परिसराबाहेर निघाली. पुढचा सहाशे मैलांचा उटी–म्हैसूरचा येता-जाताचा प्रवास आम्ही करणार होतो, त्याची सुरुवात झाली.

नंतरच्या अडीच दिवसात आम्ही बंगलोर शहरात खूपखूप भटकलो. म्हैसूर राज्याची राजधानी या दृष्टीनं पाहता या शहराला दिल्लीप्रमाणं ऐतिहासिक असं काही महत्त्व नाही. बेलूर, हळेबीडसारखं 'पूर्वदिव्य'ही नाही किंवा मसूरी, दार्जिलिंग, उटकमंड यां शहरांप्रमाणं निसर्गाचा वरदहस्तही बंगलोरवर नाही. बंगलोर म्हणजे म्हैसूरच्या भूतपूर्व दिवाणांनी लिहिलेली एक सुंदर, सामाजिक कादंबरी आहे. तांत्रिक दृष्ट्या तर अति सुंदर ! प्रशस्त, रुंद रस्ते, कब्बन पार्क, लालबागसारखी विशाल उद्यानं, गृहशिल्पाचे आदर्श नमुने असलेली मल्लेश्वरम्, बसवनगुडी अशी वाढती उपनगरं, सेक्रेटरिएट ( विधान-सौध ), सेंट्रल कॉलेज, व्हिक्टोरिया हॉस्पिटल, जयचामराजेंद्र ऑक्यूपेशनल इन्स्टिटयूट, टाऊन हॉल, अशा भव्य इमारती, इंद्रभवन, दासप्रकाश, एव्हरेस्ट, वुडलँड्स अशी पौर्वात्य आणि पाश्चात्त्य धर्तीची उच्च दर्जाची हॉटेलं वगैरेमुळं बंगलोर एक भरभराटीला आलेलं सुंदर शहर बनलं आहे. मला कित्येकदा मोह झाला की पुणं सोडून बंगलोरला स्थायिक व्हावं !

दोन दिवसांच्या त्या मुक्कामात सकाळी कॉफी, साबणाच्या फेसासारखी शुभ्र हलकी इडली, चविष्ट सांबार आणि तोंडात विरघळणारे वडे असा ब्रेकफास्ट करून प्रथम आम्ही भाजी-

मार्केटवर जात असू. वास्तविक भाजीमार्केट म्हणजे किराणा भुसार इतकंच रुक्ष ठिकाण असतं. परंतु बंगलोरचं भाजी-मार्केट आप्पांना इतकं आवडलं की ते मला म्हणत, " मी इथे दिवसभर बसून राहीन. तुम्ही आपल्या जा साड्याकुड्यांच्या खरेदीला. " या मार्केटचा एवढा लोभ जडण्याचं कारण असं की प्रवेशद्वाराच्या कमानीतून आत गेल्याबरोबर शीतल, सुगंधी वाऱ्याच्या लाटा अंगावर येत. प्रवेशद्वाराच्या आतल्या बाजूला, दोन्ही बाजूंना तऱ्हेतऱ्हेच्या फुलांचे मोठे स्टॉल आहेत. आम्ही गेलो त्या वेळी तर सोनचाफ्यांच्या फुलांचे सोनेरी ढीग फुलवाल्यापुढे रचलेले होते. काही चाफे रेशमासारखे मऊ, तलम पाकळीचे आणि फिकट, पिवळ्या रंगाचे, तर काही करंगळीएवढ्या उंच आकाराचे. सोन्याच्या पिवळ्या जर्द रंगाचे. मार्केटमध्ये प्रवेश करताच या सुंदर फुलांचा मादक दरवळ अंगाभोवती सारखा फिरत राही. त्यावर सतत शिपडलेल्या पाण्यामुळे हवा बर्फासारखी थंड वाटे आणि अबोलीच्या केशरी रंगाच्या आणि हिरव्या मरव्याच्या पार्श्वभूमीवर ही सोनेरी शोभा विशेष उठून दिसे. आप्पा या ठिकाणीच उभे राहत. मी मात्र आत जाऊन निरनिराळ्या विभागात फेरफटका मारून येई. लाकडी खेळणी, नकली दागिने, तऱ्हेतऱ्हेची भांडी, वेतांच्या टोपल्या, फळं, फळभाज्या, पालेभाज्या आणि शहाळी अशा वेगवेगळ्या वस्तूंचे वेगवेगळे विभाग होते. आम्ही मार्केटबाहेर पडत असू ते पिशवीत ओल्या मटाराच्या शेंगा घेऊन, शहाळ्यातलं थंडगार पाणी पिऊन आणि कोवळी मलई खाऊनच !

ज्या ठिकाणी यायला आप्पा नाखूष असत ते ठिकाण म्हणजे बंगलोरची 'चिकपेठ' ही बाजारपेठ. कुणीही पुरुषानं बायकोसह

भेट द्यायला घाबरावं असंच हे स्थळ आहे. मोटार रस्त्याच्या तोंडाशी ठेवूनच आत प्रवेश करावा लागतो. सीतालक्ष्मी हॉल, विजयालक्ष्मी हॉल अशा नावांची रेशमी साड्यांची आणि जवाहिऱ्यांची दुकानं या रस्त्यात एकमेकांना खेटून उभी आहेत. बंगलोरी, रेशमी साड्या आणि बंगलोरी खड्यांच्या कुड्या घेण्यासाठी या पेठेत स्त्री-पुरुषांची नेहमी गर्दी असते आणि प्रत्येक दुकानाचे टेहळे पंड्याप्रमाणे गिऱ्हाईकांवर हल्ला चढवितात. बंगलोरी खड्यांचे दागिने खरेदी करताना तर खड्यांच्या खरेखोटेपणाचा आणि उच्चनीचतेचा दर्जा ठरविण्याचा एकच मार्ग म्हणजे दुकानदाराच्या शब्दावर विश्वास ठेवणं. ज्यांना विश्वास ठेवायचा नसेल अशांसाठी उघडउघड नकली, खोटे परंतु सुंदर बनावटीचे दागिने चिकपेठच्या रस्त्याला लागूनच आत तीन-चार बोळांत पसारा मांडलेल्या राजा मार्केटमध्ये मिळू शकतात. परंतु साड्या आणि कुड्यांची खरेदी ही एक त्रासदायक गोष्ट ठरते खरी !

त्रास सोसूनही ज्या ठिकाणी जाण्याचा मोह टाळता येत नाही, असं आणखी एक स्थळ बंगलोरमध्ये आहे, ते म्हणजे बंगलोरचं सुप्रसिद्ध ' आर्ट अँड क्राफ्ट एम्पोरियम '. प्रत्येक शहराला काही नैसर्गिक आणि काही बौद्धिक वरदान मिळालेलं असतं. विशिष्ट कलांच्या कारागिरांची परंपरा काही शहरांत असते. अशा कारागिरांच्या कलेला उत्तेजन मिळावं, त्यांच्या कलावस्तूंचा प्रसार व्हावा, अशा सद्हेतूनं सरकारनं ही आर्ट अँड क्राफ्ट विक्रीकेंद्रे उघडली आहेत. शिवाय त्या त्या स्थळांची कलात्मक आठवण म्हणून खात्रीची वस्तू विकत घेण्याची प्रवाशांची मोठीच सोय होते. बंगलोरचं आर्ट अँड क्राफ्ट एम्पोरियम

फारसं भव्य नसलं तरी प्रेक्षणीय आहे. वेताच्या सुंदर टोपल्या, तऱ्हेतऱ्हेच्या बाहुल्या, रोजवुड आणि चंदनी लाकडाच्या कोरीव वस्तू, रेशमी वस्त्रं, आधुनिक पद्धतीचे मण्यांचे अलंकार—अनेक वस्तू आकर्षक पद्धतीनं मांडलेल्या आहेत. त्यांची विक्री करण्यासाठी नेमलेल्या स्त्रियाही तरुण आणि सुंदर आहेत. तक्रार एकच की गिऱ्हाइकांचं लक्ष त्यांच्याकडं जात असलं तरी त्यांचं लक्ष गिऱ्हाइकाकडे असत नाही !

आर्ट आणि क्राफ्ट एम्पोरियम आणि चिकपेठ या दोन्ही ठिकाणी गेल्यामुळे खिसा आणि ताकद खलास झालेल्या स्त्री-पुरुषांना पुन्हा ताजंतवानं करणारी दोन ठिकाणं बंगलोरमध्ये आहेत. एक बसवनगुडीवरचा नंदी आणि दुसरं लालबाग. आम्ही संध्याकाळच्या सुमाराला लालबागवर गेलो तों प्रवेशद्वार बंद होतं आणि ठिकठिकाणी पोलीस बंदोबस्त होता. चौकशी केल्यावर समजलं, की म्हैसूरचे गव्हर्नर कृष्णराजसागर वडियार यांच्या अध्यक्षतेखाली सिनेकलावंतांनी पूरग्रस्तांसाठी जमविलेल्या निधीचा अर्पण-समारंभ होता. पासाशिवाय प्रवेश बंद असल्यामुळं आम्ही आत जाऊ शकत नव्हतो. लालबागेत प्रवेश न मिळाल्यानंच केवळ बसवनगुडीचा नंदी पाहण्याची बुद्धी आम्हांला झाली. एरवी हे सुंदर स्थळ आम्ही पाहिलंच नसतं. कारण बेटय्या म्हणाले होते, ' म्हैसूरच्या चामुंडी हिलवरचा नंदी पाहणारच आहा, हा न पाहिलात तरी चालेल. ' काही फुलं देवाच्या मस्तकावर विराजमान होतात तर काही रानातल्या अज्ञात कोपऱ्यात आपलं सौंदर्य उधळतात तसा प्रकार बसवनगुडीच्या नंदीचा झाला आहे. रस्त्यापासून काही अंतरावर एक खडबडीत पाऊलवाट एका छोट्या टेकडीवर जाते. टेकडीच्या माथ्यावरचं प्रशस्त आवार,

भला मोठा पार बांधलेला जुनापुराणा वृक्ष, त्या वृक्षाच्या उंचीशी आणि जुनेपणाशी स्पर्धा करणारी दीपमाळ आणि दीपमाळे-समोरच्या ठेंगण्याशा देवळात खुरमांडी घालून बसलेला तो प्रचंड नंदी–हा सारा देखावा पाहण्यासारखा आहेच. परंतु येथे उभं राहिल्यावर थंडगार वाऱ्याच्या झुळका अंगावर घेता घेता खाली पसरलेलं सुंदर शहर पाहण्यात विशेष आनंद आहे. असं निर्मळ शहर दुसरं नसेल. रस्त्यावर पालापाचोळा, केरकचरा नाही. कचऱ्याच्या भरून वाहणाऱ्या कुंड्या नाहीत. फुटून वाहणारी गटारं नाहीत. दारिद्र्याचं प्रदर्शन करणाऱ्या गोरगरिबांच्या फाटक्यातुटक्या वस्त्याही कुठं दिसल्या नाहीत. सारं कसं स्वच्छ, सुबक! मी ड्रायव्हर नारायणला वरचेवर विचारीत असे, "इथं गरीब लोक कुठं राहतात?"

बंगलोर हे आधुनिक शहर आहे. याला ऐतिहासिक परंपरा नाही, असं मी म्हटलं खरं, परंतु जी 'लालबाग' सध्या आशिया खंडातल्या दोन-चार मोठ्या बागांपैकी एक बाग समजली जाते, ती प्रथम हैदरअल्ली आणि टिपू सुलतान यांनी तयार केली होती म्हणतात. मला वाटतं, कर्नाटकात असं एक ठिकाण नाही की जेथे पराक्रमी टिपूच्या कर्तृत्वाचा ठसा उमटलेला नाही. याचं बंगलोरातलं आणखी एक उदाहरण म्हणजे टिपू सुलतानाचा किल्ला. सोळाव्या शतकात केंपगौडा या राजानं हा किल्ला प्रथम बांधला. आणि बंगलोरच्या चारी दिशांना टेहळणीचे मनोरे बांधले. नंतर या किल्ल्याची मालकी टिपूकडे आली. टिपूने पहिल्या मातीच्या किल्ल्यावर मोगली शिल्पाचा साज चढविला. बंगलोर शहर कितीही सुधारलं, वाढलं तरी टिपूची ही आठवण कायम आहे. तेव्हा जिचा मूळ वारसा टिपू सुलतानाचा, पण जी

सध्या वनस्पतीशास्त्राचं फार मोठं संशोधन-केंद्र बनली आहे, अशी विख्यात लालबाग पाहण्यास आम्ही शनिवारी संध्याकाळी गेलो. सबंध बागेचा फेरफटका पायी करणं अशक्य ठरावं एवढी अवाढव्य बाग ! ठिकठिकाणी लोक घोळक्याघोळक्यांनी हिंडत होते. झाडाखाली हिरवळीवर बसले होते. रस्त्याच्या काठानं मैलाच्या दगडासारखी माकडांची रांग बसून राहिलेली दिसे. काही ठिकाणी वनस्पतींच्या संशोधनाची हिरवीगार दाट केंद्रं दिसत. ती पाहून 'हिरवे प्रासाद' या जंगली जीवनावरच्या इंग्रजी चित्रपटाची आठवण होई. परंतु या बागेत मला एक नाविन्यपूर्ण गोष्ट आढळली. ती म्हणजे 'ग्लास हाऊस.' राजवाड्याच्या दरबार हॉलसारखी दिसणारी ही सबंध इमारत काचांची बनवली आहे. उंच छप्पर काचांचं, भिंती काचांच्या. गावातले काही महत्त्वाचे कार्यक्रम या ग्लास हाऊसमध्ये होतात, असं ऐकल्यावर तर मला एका म्हणीची आठवण झाली व मनात आलं, एकतर या ठिकाणी व्याख्यान देणारा वक्ता आपण 'काचेच्या घरा'तून बोलत आहो, ही जबाबदारी विसरत नसावा किंवा बंगलोरची तरुण पिढी अत्यंत संयमी असावी. कारण एकाही काचेला तडादेखील गेलेला नव्हता !

सिनेकलावंतांनी जमविलेल्या पूरग्रस्तांचा निधी गव्हर्नरला अर्पण करण्याचा समारंभ याच ठिकाणी झाला होता. लालबागेच्या फाटकाबाहेर जेव्हा पोलिसांनी आमची मोटार अडवली तेव्हा मला चुटपूट लागली होती की सिनेनटनट्या पाहण्याचा एक मोका हुकला. पण त्याच दिवशी संध्याकाळी टाऊन-हॉलमध्ये झालेल्या 'रसमंजिरी'च्या कार्यक्रमाला आम्ही जाणार होतो. बंगलोरसारख्या मोठ्या शहरातल्या सिने-कलावंतांनी सादर

केलेली ' रसमंजिरी ', तिकिटंही मुष्किलीनं मिळाली. तेव्हा आम्ही मोठ्या अपेक्षेनं गेलो. परंतु ' रस ' थोडा आणि मंजिऱ्या तर नाहीतच असा अनुभव आला. आमची अपेक्षा अशी की तेलगू चित्रपटातले आम्हांला ऐकून ठाऊक असलेले शिवाजी गणेशन, जैमिनी गणेशन, सरोजादेवी, अंजलीदेवी या नटनटी पाहायला मिळतील. परंतु रंगभूमीवर अगदीच अपरिचित चेहरे येऊ लागले. त्यातून सर्व कार्यक्रम कानडी भाषेत चालल्यामुळं जे जे होईल, ते ते पाहणं एवढंच आम्ही करू शकत होतो. आमच्या शेजारच्या गृहस्थांनी आम्हांला सांगितलं की हे कन्नड चित्रपटांतले कलावंत. प्रवेशद्वारातून एखादी व्यक्ती आत आल्यावर टाळ्यांचा मोठा कडकडाट होई. आम्ही डोकडोकावून आशेनं पाहत असू की एखादी कन्नडसुंदरी दिसेल, पण प्रत्यक्षात मात्र भारी, रेशमी वस्त्रांत एखादी लठ्ठ, बेढब स्त्री प्रेक्षागृहात येताना दिसे आणि आमचा शेजारी सांगे, " ही पाहा राजम्मा. " या नटांनी काही प्रवेश करून दाखविले, तेही अगदी सामान्य दर्जाचे होते. पुरुष नटांपैकी दोन नट आपल्या शाहू मोडकाप्रमाणं गोंडस दिसले, पण विजयनगरच्या वीर पांड्य राजाचे काही प्रवेश त्यांनी मोठे दणदणीत केले. रंगभूमी आणि कन्नड प्रेक्षकांची अंत:करणं नुसती हादरून गेली. संभाजीराजांच्या किंवा हॅम्लेटच्या स्वागतासारखा सारा थाट होता. अभिनय जुन्या थाटाचा परंतु कानडी भाषा वीररसाला अधिक अनुकूल असल्यामुळे की काय आम्हांलाही राजकुमार या गुणी नटाचे हे प्रवेश परिणामकारक वाटले. बी. हनुमंथाचार या वादकानं एक चमत्कार करून दाखविला. सुमारे दोन फूट लांबीची पेटी घेऊन तो स्टेजवर येऊन बसला आणि त्या पेटीतून त्यानं सर्व वाद्यांचे स्वर काढून दाखविले.

ऑर्गन, हार्मोनिका, व्हायोलिन, सनई आणि शेवटी शेवटी तर कोसळणारा धबधबा, उडणारे जेट विमान, धावणारं स्कूटर आणि खेडेगावांतली गिरणी–असेही चित्रविचित्र आवाज हुबेहूब काढून हनुमंथाचारनी कडकडून टाळ्या मिळविल्या. आश्चर्य असं की पेटीप्रमाणं या वाद्याला भाता नव्हता किंवा सनईप्रमाणं तो ते फुंकीतही नव्हता. आम्हांला हे वाद्य पाहण्याची आणि हनुमंथाचार यांची मुलाखत घेण्याची फार इच्छा होती. ते आणि इतर कलावंत मंडळी वुडलँड्स मध्येच उतरली होती. किंबहुना 'तेरी प्यारी प्यारी सूरतको' हे गाणं कधी व्हायोलिनमध्ये तर कधी सनईत वाजलेलं आमच्या खोलीत ऐकू येत असे. परंतु त्या वेळी मला वाटलं होतं, करीत असेल कुणी हौशी कलावंत रियाज. या वाद्याचं नाव 'युनिव्हॉक्स' आणि हनुमंथाचार मद्रासला वीरप्पन स्ट्रीटवर राहतात, एवढीच माहिती आम्हांला समजली. हनुमंथाचार यांची भेट होऊ शकली नाही. कारण ते तातडीनं मद्रासला परतले होते.

विठ्ठल प्रॉडक्शन्स या कंपनीच्या संगीत दिग्दर्शकांनी तर धमाल उडवून दिली. साथीला हनुमंथाचार होते. संगीत दिग्दर्शकाचं नाव मला वाटतं, मोहनराव असावं. किशोरकुमारच्या धर्तीची पाश्चात्त्य संगीताचे स्वर असलेली त्यांची गाणी लोकांना आवडलीच, परंतु त्यांच्या कर्नाटक गीतानं लोक अगदी बेहोष होऊन गेले. त्या गीताची चाल अगदी साधी, परंतु त्यातला आशय जाज्वल्य होता. 'आमचा कन्नड देश सुंदर, आमची कानडी भाषा सुंदर, आमची संस्कृती सुंदर, आमचे संत सुंदर, साहित्य सुंदर, संगीत सुंदर'–सुंदर या मराठी शब्दाला 'चंदा' हा कानडी प्रतिशब्द आहे. तेव्हा 'चंदा' हा शब्द वरचेवर येणारं

हे गीत प्रेक्षकांनी उचलून धरलं. ठका धरला. कडकडून टाळ्या बडविल्या आणि तीनदा वन्स-मोअर दिले. याचं कारण अगदी उघड होतं. भाषिक वादामुळं माजलेल्या असंतोषात तेल टाकणारं हे गीत होतं. आमचं बंगळूर, आमचं म्हैसूर असं वर्णन करताना 'बेळगाव कारवार, धारवाड, कित्तूर' अशा शहरांची नावं गायकानं उच्चारली की टाळ्या पडत होत्या. भावना भडकत होत्या. साहित्यानं क्रांती घडत नाही, असं आप्पा म्हणतात खरं, परंतु एका उडत्या चालीच्या गीतानं कन्नड लोकांच्या भावना हलाव्या, प्रक्षुब्ध व्हाव्या, याचा मग खुलासा काय ?

रविवारी दुपारी दीड वाजता आम्ही बंगलोरचा निरोप घेतला तेव्हा अडीच दिवसांच्या अनेक आठवणी मनात गर्दी करीत होत्या. 'आपण पुन्हा भेटलंच पाहिजे,' असं बजावीत आपण आवडलेल्या मित्रमंडळींचा निरोप घेतो त्याप्रमाणं बंगलोरला पुन्हा भेट देण्याचा बेत करीतच आम्ही वुडलँड्सच्या आवाराबाहेर पडलो. आमची मोटार कृष्णराजसागराच्या रस्त्यानं निघाली.

बंगलोर ते कृष्णराजसागर हा अठ्ठ्याहत्तर मैलांचा प्रवास तीन तासांत आटोपला होता. कारण रस्ता साटणीच्या रिबनसारखा गुळगुळीत होता. वेळ भर दुपारची असली तरी हवा थंड होती. रामनगर, हमुमंतरायरगुड, चन्नपटम, मंड्या अशी नीटनेटकी शहरं लागत होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूंना भाताची हिरवीगार शेतं डुलत होती. नारळीची बनं झुलत होती. शहरांच्या लगत ठिकठिकाणी शेतकीच्या प्रयोगशाळा लागत होत्या. केंद्रं दिसत होती. साखरेचा कारखाना, शाळा, थिएटर वगैरे विस्तीर्ण इमारती पाहिल्या की या भागात निअर्ग साणि मानव

हातांत हात घालून प्रगतीचे मोठमोठे टप्पे गाठीत आहेत, असं वाटतं. वृंदावन गार्डन्सच्या परिसरात आम्ही रविवारी साडेचार वाजता पोचलो. धरणाच्या भिंतीवरून फेरफटका मारून कृष्ण-राजसागरच्या भव्य हॉटेलात पाचाच्या सुमाराला परतलो होतो. नेहमीप्रमाणं इथेही आप्पांनी वेटरशी भांडण काढून धमाल उडविली होती. आम्हांला चहा, टोस्ट हवा होता आणि मुदपाक-खाना बंद असल्यामुळं 'सॉरी' असं खांदे उडवून वेटर सांगत होता. अर्थात चहा टोस्ट मिळाल्यावरच आप्पा शांत झाले होते. कृष्ण-राजसागर हॉटेल म्हणजे बडा घर पोकळ वासा ठरणार की काय असं भय वाटू लागलं होतं. इतक्यात स्टुअर्ड डेनिस सबॅस्टियन आम्हांला येऊन भेटला होता. आगत्यानं आमची विचारपूस करून रात्री डिनरचा बेत सांगून तो निघून गेला. तेव्हा आपण 'सरकारी पाहुणे' असल्यासारखं वाटतं होतं.

वृंदावन उद्यानातील कारंजांचं अपूर्व रंगीत नृत्य पाहताना आपण होतो कुठं आणि आलो कुठं असे उद्‌गार आमच्या तोंडून निघाले होते आणि काही वेळ आम्ही वृंदावन उद्यानाची रोष-णाई पाहत उभे राहिलो होतो. वाटलं होतं, समोर चाललेला हा सौंदर्याचा विलास आणि ही घटका कधी सरूच नये.

परंतु सगळ्या गोष्टींना अंत आहे, पण तो अपरिहार्य आहे.

कृष्णराजसागराचा निरोप घेताना हाच विचार प्रामुख्यानं माझ्या मनात घोळत होता. कृष्णराजसागरच्या बादशाही हॉटेला-तले चोवीस तास औटघटकांचं राज्य करणाऱ्या राजाप्रमाणं आम्ही घालविले होते. खोलीच्या उंच दारावर आणि प्रशस्त खिडक्यांवर सोडलेले साटीन ब्रोकेडचे पडदे, सुंदर फर्निचर, शंभर माणसं आरामात जेवतील असा उत्तम सजविलेला डायनिंग

हॉल, अवतीभोवती मेणाच्या पुतळ्यांप्रमाणं हालचाली करणारे, ओठातल्या ओठांत पुटपुटणारे अत्याधुनिक स्त्री-पुरुष आणि त्या सर्व अपरिचित वातावरणाला बुजलेल्या माझ्या मनाला धीर देणारा, स्वतःची आठवण म्हणून 'मेनूकार्ड'ची भेट सही करून देणारा, आप्पांची इंग्रजी कादंबरी परतभेट म्हणून मागून घेणारा स्पॅनिश स्टुअर्ड डेनिस सबॅस्टियन–यांच्या आठवणी गर्दी करू लागल्या. आता दुपारच्या प्रहरी समोरच्या वृंदावन उद्यानावर स्वच्छ सूर्यप्रकाश पडला होता आणि मेकअप् पुसलेल्या स्त्रीच्या चेहऱ्याप्रमाणं वृंदावन उद्यान फिकट दिसू लागलं होतं. कर्दळीचे वाफे रुक्ष दिसू लागले होते. मी चटकन माझी नजर वळविली, कारण मला स्मृतीत साठवून ठेवावयाची होती ती रंगीत जल-धारांनी आणि प्रकाश-किरणांनी नटलेली वृंदावनाची बाग !

वृंदावनाच्या कृष्णराज सागर हॉटेलबाहेर पडण्यापूर्वी मी आवारातल्या कावेरीमातेची पूजा केली. भटजी गंगास्तवन म्हणत होता. धरणाच्या भिंतीच्या पार्श्वभूमीवर कावेरीमातेची काळी पाषाणमूर्ती आकर्षक दिसत होती. तिच्या ओंजळीतून सामर्थ्य-शाली जलधारा सांडत होत्या. कावेरीमातेला नमस्कार करताना मी म्हटलं, " माते कावेरी, तू किती रूपांनी मला दर्शन देणार आहेस, कुणास ठाऊक ! परंतु एकीकडे कृष्णराजसागराचं विराट रूप आणि दुसरीकडे वृंदावनाची स्वर्गीय शोभा हा अर्धनारी–नटेश्वराश्वराचा तुझा अवतार पाहून मी धन्य झाले. "

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## २

# " सा रम्या नगरी ! "—म्हैसूर

अंत:करणाचा थरकाप उडविणारा रामायणातला जो जटायु-वधाचा प्रसंग जणू आमच्या डोळ्यांसमोर आता साक्षात् घडत होता.

निर्जन वनात एका शिलाखंडावर पाय रोवून, उजव्या हातातलं खड्ग उंच उवेत उगारून, डाव्या हाताच्या कवेत कसायानं कोकरू धरावं तशी जानकीला धरून क्रूरकर्मा रावण उभा आहे. प्राण पणाला लावून त्याच्यावर झेप टाकणाऱ्या जटायूचा एक पंख त्यानं आधीच तोडून टाकला आहे आणि उरलेला तोडून टाकण्यासाठी खड्ग उभारलेलं आहे. प्राणघातक प्रहारानं पंख तुटून पडला तरी उरलेल्या एका पंखानिशी जटायू अंतराळात धडपडत आहे. शरीरात प्राण असेतोपर्यंत जानकीला वाचविण्यासाठी रावणाशी झुंज खेळण्याचा निर्धार त्याच्या दृष्टीत स्पष्ट

दिसत आहे. त्याच्या चोचीचे बाण रावणाच्या छातीत ठिक-ठिकाणी घुसले आहेत. रावणाच्या गळ्यातला मोत्याचा सर तुटून मोती खाली ओघळले आहेत. धरणीवर, हवेत जटायूची पिसं विखुरली आहेत. एका यःकश्चित् पाखराचं एवढं धाडस— अशा विचारानं रावणाचं क्रौर्य आगीत तेल पडल्याप्रमाणं उसळलेलं दिसत आहे. उगारलेल्या खड्गानं जटायूचा प्राण घेण्यापूर्वीच रावणाच्या लालभडक नेत्रातील ज्वालांमुळे तो हवेतच भस्मसात तर होणार नाही, अशी भीती वाटू लागली आहे. रावणाच्या मुद्रेवर विकट हास्य आहे. ज्या तऱ्हेनं तो उभा आहे, ज्या तऱ्हेनं त्याच्या डाव्या हाताची पकड जानकीच्या कमरेभोवती पडली आहे, त्यात त्याचा उन्मत्तपणा कळसाला पोचलेला दिसतो आहे आणि बिचारी जानकी ! जटायूचं बलिदान आणि स्वतःची विटंबना पाहणं नको अशा शरमेनं तिनं मान खाली घातली आहे. दोन सुकुमार पंजांत तिनं आपलं कलंकित मुखमंडल दडवलं आहे. तिच्या त्या झाकलेल्या मुद्रेतूनच तिची असहाय्यता, तिचं तीव्र दुःख किती उघड उघड दिसत होतं ! जानकी, रावण आणि जटायू यांच्या रूपानं जणू कारुण्य, क्रौर्य आणि शौर्य या तिन्ही रसांची कारंजी चित्रकाराच्या कुंचल्यातून उसळत होती. हजारो वर्षांपूर्वी घडलेल्या रामायणातील तो विलक्षण प्रसंग आमच्या डोळ्यांसमोर पुन्हा प्रत्यक्ष घडत होता. या चित्रापुढून हलावंसं वाटत नव्हतं !

जगन्मोहन पॅलेसचं चित्रमंदिरात रूपांतर करण्याची कल्पना १९१५ साली प्रथम त्या वेळचे महाराज कृष्णराज वाडियार यांच्या मनात आली. तेव्हापासून नंतरच्या चाळीस वर्षांत या आर्ट गॅलरीची सर्व बाजूंनी भरभराट होत गेली आहे. संगीता-

प्रमाणं चित्रकलेतही निरनिराळी घराणी असतात. रजपूत, मोंगल शांतिनिकेतन वगैरे. या निरनिराळ्या घराण्यांतील चित्रांसाठी निरनिराळ्या विभागांची योजना केली आहे. त्या त्या घराण्यांतील चित्रमहर्षींची निवडक चित्रं खास खोल्यांतून लावलेली आहेत. चुगताईची चित्रं चुगताई हॉलमध्ये तर रोरिच यांची रोरिच हॉलमध्ये. राजा रविवर्मा या श्रेष्ठ चित्रकारासाठी जगन्मोहन पॅलेसच्या तळमजल्यावरचा मोठा दिवाणखाना राखून ठेवला आहे. या दिवाणखान्यात रविवर्म्याची जवळजवळ वीस मोठी चित्रं भिंतीवर लटकलेली आहेत. बहुतेक चित्रांचा विषय रामायणमहाभारतातून निवडलेला आहे आणि या प्रतिभासंपन्न चित्रकाराच्या असामान्य कलेची किमया अशी की प्रत्येक प्रसंग जणू आमच्या डोळ्यांपुढं पुन्हा प्रत्यक्ष घडत होता. जटायूवध पाहताना त्या चित्रापुढून हलावंसं वाटत नव्हतं.

कीचकाच्या भेटीसाठी जड पावलांनी निघालेल्या सैरंध्रीकडंही आमची दृष्टी खिळून राहिली. वसुदेव-देवकीची तुरुंगातून सुटका करणारे कृष्णबलराम देवकीच्या हातातील शृंखला तोडीत होते, ते पाहावंसं वाटत होतं आणि नव्हतंही. हंसदूताचं स्वागत करणाऱ्या दमयंतीच्या कुरळ्या केशसंभाराइतकंच तिच्या भरजरी पदरात आणि गळ्यातील सोन्याच्या किंचित उचललेल्या कडक सरीत माझं मन अडकत होतं. मत्स्यगंधेच्या बापाजवळ मागणी घालणारा राजा शंतनू, साध्या कोळणीच्या वेषातली लाजलेली राजाकडे चोरटा कटाक्ष टाकणारी गोमटी मत्स्यगंधा तिच्याजवळ उभी राहिलेली, हुरळून गेलेली तिची आई, जवळ उघड्या अंगाचा, फक्त लंगोटी लावलेला तिचा बाप—हे चाललंय तरी काय, अशा आश्चर्यानं भांबावलेल्या मत्स्यगंधेचा आठदहा

वर्षांचा भाऊ, उजव्या अंगाला राजवस्त्रांकित शंतनू, डाव्या कोपऱ्यातल्या चंद्रमौळी झोपडचा, पुढचात उकिरडा विसकटणारी कोंबडी—अशा प्रकारची या चित्राची रचना करण्यात चित्रकाराच्या कल्पनाशक्तीचा केवढा विलास दिसत होता. रेषेचा दृढपणा, रंगयोजनेतलं चातुर्य, छायाप्रकाश, वस्तुरचना या सर्व गुणांचा विलास या सर्व चित्रांत होताच, परंतु मन थक्क होतं ते चित्रकाराच्या कल्पनाशक्तीपुढं. रामायण-महाभारतातील प्रसंग सर्वांच्याच परिचयाचे आहेत; परंतु रंगरेषांच्या साहाय्यानं तो दाखविण्यासाठी त्या त्या प्रसंगाची जी कल्पना रविवर्म्यानं केली, तिची प्रशंसा करावी तेवढी थोडीच होईल.

जगन्मोहन पॅलेसमधील या चित्रालयात आम्ही जवळजवळ तीन तास हिंडत होतो. चुगताई, रोरिच, नंदलाल बोस, माधव मेनन, प्रमोदकुमार चॅटर्जी, केशवय्या, वेंकटप्पा या प्रख्यात चित्रकारांची अनेक चित्रं इथं आम्ही पाहिली. सर्वांत वरच्या मजल्यावर मांडलेलं वाद्यवृंदाचं प्रदर्शन पाहिलं. तळमजल्यावर एका लहान काचेच्या पेटीत श्री. वैद्यनाथन या कलाकारानं तांदळाच्या प्रत्येक दाण्यावर एकेक असे कोरलेले दशावतार पाहिले. तीन तास मोठमोठ्या कलावंतांच्या सहवासात गेले. एका विलक्षण समाधानात आम्ही जगन्मोहन पॅलेसच्या बाहेर पडलो.

सोमवारी डिसेंबर महिन्याच्या चार तारखेला दुपारचं जेवण आटोपून वृंदावन गार्डन्समधून आम्ही निघालो, तेव्हा साहजिक मनात एकच विचार होता—आता म्हैसूर. म्हैसूरला गेल्यावर हे पाह्यचं, ते पाह्यचं असे बेत आम्ही करीत होतो. म्हैसूर शहरात आणि आजूबाजूच्या पन्नास-साठ मैलांच्या परिसरात इतक्या

पाहण्यासारख्या गोष्टी आहेत की, म्हैसूर म्हणजे प्रवाशांची पर्वणीच होय.

दख्खनच्या पठारावर निलगिरी पर्वताच्या पूर्व–पश्चिम पसरलेल्या बाहूंच्या मिठीत म्हैसूर शहर वसलेलं आहे. दक्षिणेला कावेरी आणि उत्तरेला तुंगभद्रा या दोन नद्यांनी म्हैसूरला जगात गाजलेले सुंदर धबधबे दिले आहेत. म्हैसूरची भूमी आणि जीवन सुपीक आणि सुसंपन्न केलं आहे. निलगिरीनं टीक, एबनी, रोज-वुड, ब्लॅकवुड, सीडर, चंदन यांची घनदाट अरण्यं बहाल केली आहेत. या अरण्यात हत्तींचे, वाघांचे, हरिणांचे कळप वावरत असतात. निसर्गाची म्हैसूरवर अशी मेहेरबानी आहे.

परंतु कोणत्याही देशाचा अगर प्रांताचा भूगोल इतिहासच घडवीत असतो. म्हैसूर संस्थानाचे प्रजाप्रेमी राजा आणि सुदैवानं त्यांना लाभलेले कर्तृत्ववान दिवाण यांनी निसर्गाशी सहकार्य करून म्हैसूरला वेगळंच वैभव मिळवून दिलं आहे. ‘ पूर्व दिव्य ज्यांचे त्यांना रम्य भावि काल ’ असं कवीनं म्हटल्याप्रमाणं कदाचित म्हैसूरचं सध्याचं वैभव त्या पूर्व दिव्याचाच वारसा असू शकेल. चंद्रगुप्त मौर्यानं जैन धर्म स्वीकारला आणि सर्वसंगपरि-त्याग करून तो म्हैसूरजवळच्या श्रवण बेळगोळाच्या अरण्यात तपस्या करू लागला. चंद्रगुप्त मौर्याचा नातू सम्राट अशोक यांचे शीलालेख चित्तलदुर्ग तालुक्यात दया-क्षमा-शांतीचे संदेश अजूनही देत आहेत. रामानुजाचार्य, बसव, माधव, पुरंदरदास हे सारे तत्त्वज्ञ, संत या म्हैसूरच्या भूमीत वाढले. भारताला लागलेल्या इंग्रजी सत्तेच्या खग्रास ग्रहणाचा भेद करण्याचा मनसुबा टिपू सुलतानानं रचला तो याच भूमीत. अशा विलक्षण ऐतिहासिक घडामोडींना मोठी प्रतिष्ठा मिळवून दिलेली ही म्हैसूर नगरी

आणि हिचं आसमंत इतिहासाच्या अभ्यासकांना आणि प्रवाशांना प्रेक्षणीय वाटतं.

श्रीरंगपट्टण, सोमनाथपूर, तोन्नूर, मेलुकोटे, श्रवण बेळगोळ, बेलूर, हळेबीड, श्रृंगेरी, चित्तलदुर्ग, शिवसमुद्रम्, जोगफॉल्स ही सारी स्थळं म्हैसूरपासून पन्नास ते साठ मैलांच्या परिघरेषेतच आहेत. म्हैसूरमध्ये मुक्काम ठेवून रोज यांपैकी एकेक स्थळ पाह्यचं म्हटलं तर आठपंधरा दिवस सहज लागतील. खुद्द म्हैसूर शहरात पाहण्यासारख्या ज्या स्थळांची यादी आम्हाला श्री. बेटय्यांनी दिली होती, त्यात सेंट्रल पॅलेस, ललितमहाल, राजेंद्रविलास आणि जगन्मोहन हे चार राजवाडे होते. चामुंडीचं मंदीर, सेक्रेड बुल, प्राणिसंग्रहालय, म्हैसूर एंपोरियम वगैरे स्थळं होती. परंतु परमुलखातली स्थळं पाहण्यात भाषा, वाहनं आणि मार्गदर्शन या तीन अडचणी सोडवाव्या लागतात.

वाहनाचा प्रश्न आम्ही सोडविला होता. परंतु आमच्या ड्रायव्हरला आमचं बोलणं समजत नव्हतं आणि त्याचं तामिळीहिंदी आम्हांला कळत नव्हतं. शिवाय गाडीच्या चार चाकांपलीकडे प्रक्षणीय असं काही जगात आहे, याची त्याला उत्सुकताही नव्हती. जगन्मोहन पॅलेसमधून आम्ही बाहेर पडलो आणि मोटारीत जाऊन बसलो तेव्हा पुढं काय पाह्यचं याच विचारात आम्ही पडलो होतो आणि ड्रायव्हर नारायण थंड, निर्विकार चेहऱ्यानं आमच्या हुकूमाची वाट पाहत चाकामागं बसून होता. तोच, " मे आय स्पीक टु युवर ऑनर ? " अशा खड्या आवाजातलं वाक्य आमच्या कानी पडलं. पाहतो तो मोटारीच्या खिडकीशी एक व्यक्ती उभी होती. ज्या सफाईनं ते वाक्य तो बोलत होता, त्या सफाईशी विसंगत वाटणारा त्याचाअवतार होता. कमरेला

लुंगी, खिशात कागदाची जुडगी कोंबलेला एक मळका शर्ट, चुंबळीसारखं डोक्याला गुंडाळलेलं एक फडकं, थकलेला, ओढलेला चेहरा, वाढलेली दाढी ! 'हे कोण पात्र ?' असा प्रश्न आप्पांनी विचारला नाही एवढंच ! तो इंग्रजीत बोलला होता तेव्हा आम्ही मराठीत एकमेकांशी बोलू लागलो. 'आपल्याला गाईडबिईड करायचाय काय ? त्यातून असलं ध्यान तर मुळीच नको . . ."

"आपण परवानगी द्याल तर मी आपल्याला सर्व काही दाखवू शकतो," असं खणखणीत स्पष्ट मराठी वाक्य कानी पडताच आम्ही चमकलो, गप्प झालो. इथं दूर कर्नाटकात आण्णासाहेब कर्व्यांप्रमाणं कुणी स्वच्छ मराठी बोललेलं ऐकू येईल, अशी आम्हांला कल्पनाही नव्हती. आश्चर्याचा पहिला धक्का ओसरल्यावर 'तुम्हांला इतकं चांगलं मराठी कसं बोलता येतं ?" असं आप्पांनी त्याला विचारलं.

"युवर ऑनर" तो म्हणाला, "एक कमी सात इयत्ता माझं शिक्षण झालेलं आहे, पण युवर ऑनरसारख्या मोठ्या लोकांच्या संगतीमुळं इंग्रजी–मराठी बोलू शकतो. मला व्यंकटेश अय्या बालाजी म्हणून म्हणतात. सात कच्च्याबच्च्यांचा बाप आहे मी. सारी उमर या धंद्यात गेली . . ." असं बोलता बोलता बालाजीनं उडी मारून पुढच्या सीटचा आमच्या नकळत कब्जा घेतला व तो म्हणाला, "आता युवर ऑनरची परवानगी असेल तर सरळ गव्हर्न्मेन्ट हाऊसवर जाऊन पास काढून ललितमहाल पॅलेस पाहून येऊ या."

आमचा मोठाच प्रश्न सुटला होता. आमच्या परवानगीची वाट न पाहता बालाजी नारायण ड्रायव्हरला म्हणाला, "अभी चलो सीधा गव्हर्न्मेन्ट हाऊसपर. गाडी ये बाजूसे लेना. चलो."

बालाजीचं बोलणं कानांत न शिरल्याप्रमाणं नारायण थंडपणं चाकामागं बसून राहिला. "चला नारायणराव" असं आप्पा म्हणाले तेव्हा कुठं नारायणनं स्टार्टर दावला आणि मोटार सुरू केली.

पहिल्या भेटीतच आमच्या ड्रायव्हरनं बालाजीशी शीत युद्ध पुकारलं असलं तरी आमचा म्हैसूरमधला पुढचा तीन दिवसांचा मुक्काम यशस्वी झाला, याचं सारं श्रेय बालाजीलाच द्यायला हवं. बालाजी म्हणजे एक चालताबोलता संदर्भ ग्रंथ होता. म्हैसूरच्या इतिहासातल्या राजकीय घटना, सनावलीसह जशा त्याला मुखोद्गत होत्या, त्याप्रमाणं संस्थान खालसा झाल्यानंतर म्हैसूरच्या राजकीय पटावर कोणती मोहरी कशी खेळताहेत त्याचीही बातमी त्याला होती. परंतु राजघराण्याविषयी किंवा कुणाही अधिकाऱ्याविषयी अनुदार उद्गार न काढण्याइतका सुसंस्कृतपणा त्या सामान्य माणसाच्या ठिकाणी होता. कंटाळ-वाणेपणा येऊ न देता एखाद्या स्थळाचं, व्यक्तीचं थोडक्यात वर्णन कसं करावं हे त्याला कळत होतं. पास, परवानग्या काढणं, टिप्स देणं या कटकटीतून प्रवाशांची सुटका करावी, त्याच्या मनातली उत्सुकता कशी जागी करावी, याच्या खुब्या त्याला अवगत होत्या. बालाजीच्या आग्रहामुळेच केवळ म्हैसूरचे तीन मोठे राजवाडे आम्ही पाहिले. नाही तर काय पाहायचे राजवाडे ? पुष्कळ पाहिले आहेत—असं म्हणून आम्ही ते आमच्या कार्यक्रमा-तून गाळलेच असते.

चामुंडी टेकडीच्या पायथ्याशी आडव्या रस्त्यावर ललित-महाल राजवाडा म्हणजे सध्या बडचा बडचा पाहुण्यांसाठी राखून ठेवलेलं अतीथिगृह. म्हैसूरच्या भेटीसाठी पंतप्रधान,

राष्ट्रपती किंवा मुख्यमंत्री पाहुणे येतात, तेव्हा त्यांची राहण्याची सोय ललितमहालमध्ये केली जाते. ललितमहालच्या भव्य जिन्याचा कठडा इटालियन संगमरवरी दगडाचा बनविला आहे आणि काही भिंती अमेरिकन वॉलपेपरनं सजविल्या आहेत. ललितमहालामधली सारी सजावट राजेशाही आहे. विशेष लक्षात राहण्याजोग्या गोष्टी म्हणजे पब्लिक डायनिंगरूम आणि बॉलरूम. या दोन्ही प्रशस्त दिवाणखान्याचा सध्याच्या जमान्यात फारसा उपयोग नसावाच. डायनिंग हॉलमध्ये एक लंबवर्तुळाकार टेबलांची एकसंध रांग मांडलेली होती आणि वर्तुळाच्या आतल्या आणि बाहेरच्या बाजूंनी मांडलेल्या खुर्च्यांवर दोनशे माणसं सहज जेवायला बसली असती. या डायनिंगरूमशेजारी तेवढीच विस्तृत अशी बॉलरूम होती. या बॉलरूमची जमीन पॉलिश केलेल्या लाकडी पातळ फळयांची होती. व्यासपीठाप्रमाणं उंच केलेल्या प्लॅटफॉर्मवर बँडवादक बसत असत. चारी बाजूंना गॅलरी असल्यामुळं खाली चाललेला बॉल डान्स पाहण्याची निमंत्रितांची सोय होती. . . .

अशी सारी माहिती सांगून बालाजी डान्सहॉलच्या मध्यभागी उभा राहिला आणि लहान मुलं गादीवर नाचतात, तशी पावलं टाकू लागला. तो काय आश्चर्य, साऱ्या जमिनीलाच मंद मंद झोके बसू लागले. आम्हीही पावलं टाकून पाहिली, तो भास झाला, जमीन आपल्याला झेलते आहे, त्या क्षणी एके काळी त्या बॉलरूमचं वैभव कसं असेल याचं चित्र डोळयांपुढं सरकून गेलं. मंद संगीत सुरू आहे, त्या तालावर उंची पोशाखात आंग्ल स्त्री-पुरुष नृत्य करीत आहेत आणि त्यांच्या पावलांबरोबर खालीवर होणारी जमीन सागराच्या पृष्ठभागाप्रमाणं हेलावत आहे. . . फ्लोअ-

रिंगच्या फळ्याखाली लोखंडी स्प्रिंगा बसविल्यामुळं जमीन हलते, असा खुलासा बालाजीनं केला होता.

चामुंडी हिलवरच्या राजवाड्याचं नाव राजेंद्रविलास पॅलेस असं आहे. उन्हाळ्यात या टेकडीवरच्या थंड हवेच्या ठिकाणी राजघराण्यातली माणसं येऊन राहतात. राजेंद्रविलासला पॅलेस म्हणण्यापेक्षा एक अत्यंत सुंदर बंगला असंच म्हणता येईल. बंगल्यातल्या सज्जात उभं राहिलं की चामुंडी टेकडीखाली पसरलेल्या अफाट म्हैसूर शहराचा सुंदर देखावा दिसतो. बंगल्यातली सजावट राजेशाही थाटाची नसून, आधुनिक पद्धतीची आहे. याही राजवाड्यात एक वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट आढळली. तळमजल्यावरच्या पुढच्या हॉलमधून दुसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी दोन समांतर जिने आहेत. रोजवुडच्या सुंदर कठड्याचे हे जिने वरच्या आडव्या लॉबीला मिळतात. आम्ही नि:शंकपणे या जिन्यानं वर चढून गेलो. पाहतो तो बरोबर तसाच जिना समोर दिसला. म्हणजे तिसऱ्या मजल्यावर जाण्यासाठी पुन्हा तसेच दोन जिने होते म्हणायचे. पण त्या जिन्याच्या पायथ्याशी ही कोण उभी ? मीच दिसते आहे ! हा काय चमत्कार ? आणि एकच मी नव्हे ! शेकडो मींची रांगच रांग !

मग आजूबाजूची माणसं गालांत हसू लागली. तेव्हा खरा प्रकार माझ्या लक्षात आला. जिन्यापुढच्या आडव्या लॉबीत एक अंकण लांबीरुंदीचे मोठमोठे आरसे ओळीनं लावलेले आहेत. मी डावी उजवीकडे पाहिलं तो माझ्यासारख्या बायकांची एक पलटणच लांबवर उभी दिसली. म्हणजे ही लॉबी लांब तरी किती होती ! पण हाही एक भ्रमच होता. समोरच्या आरशाशी काटकोन करून हा दृष्टिभ्रम निर्माण केला होता. आम्ही किती

तरी वेळ हा चमत्कार आरशात पाहत राहिलो. आरशात पाहण्याचा असा नादिष्टपणा मी पूर्वी कधीच केला नसेल.

जगन्मोहन, ललितमहाल आणि राजेंद्रविलास या तिन्ही प्रासादांपेक्षा ज्यांचं शिल्प आणि सजावट अत्यंत भव्य आहे, असा सेंट्रल पॅलेस पाहण्यासाठी म्हैसूरचे गव्हर्नर आणि माजी राजे कृष्णराज वडियार यांच्या पर्सनल सेक्रेटरीची परवानगी काढावी लागते. आम्ही पर्सनल सेक्रेटरीच्या ऑफिसात गेलो तेव्हा वेळ दुपारची होती आणि ऑफिसबाहेरच्या रुंद लांबीतलं वातावरण तापलेलं होतं. उन्हाप्रमाणं पोटात भूकही कडकडली होती. बालाजीनं पाच मिनिटात सेक्रेटरीची भेट होईल, असं सांगितलं होतं खरं, पण अर्धा तास झाला तरी आतल्या साहेबाचं बोलावणं येत नव्हतं. आधीच आत गेलेल्या माणसाचं काम संपत नव्हतं आणि माझ्या आधी आलेल्या माणसांनी क्यू लावला होता. मी बालाजीला खुणा करत होते, " चल बाबा. किती वेळ रखडायचं ? साहेबाची भेट अशक्य. झाली तरी पॅलेस पाहण्याची परवानगी मिळणं अशक्य." कारण ऑफिसबाहेरच्या भिंतीवर ' पॅलेस क्लोज्ड फॉर टूरीस्टस्, पास मिळणार नाहीत. ' अशा ठळक नोटीसा लावलेल्या होत्या. एवढ्या पाट्या वाचूनही वर पास मागण्यासाठी आत जाणारा माणूस एक निरक्षर तरी असला पाहिजे किंवा आमच्याप्रमाणं निगरगट्ट !

अखेर मला बोलावणं आलं. पास मिळावा म्हणून तयार केलेल्या भाषणाची उजळणी करीत मी आत प्रवेश केला, पण मी काही बोलण्यापूर्वीच सेक्रेटरीसाहेबांनी सही करून माझ्या हातात एक तांबडं पाकीट दिलं. म्हणाले, " This will do the trick –" म्हणजे वाघ मारण्याच्या तयारीनं जावं आणि बंदूक

उडविण्याचीदेखील गरज भासू नये तसा प्रकार घडला.

याबद्दल मी नंतर आश्चर्य करू लागले. तेव्हा बालाजी हळूच म्हणाला, " त्यात आश्चर्य कसलं ? मी शिपायाबरोबर निरोप धाडला होता. साहेबांना की बाहेर पुण्याची संस्थानिक मंडळी आली आहेत ! "

शाब्बास बालाजी ! आम्हांला एकदम हसू कोसळलं.

सेंट्रल पॅलेसच्या आवारात दबदबा होता. प्रवेशद्वाराच्या कमानीखाली हत्यारी पोलिस पहारा करीत होते. आतल्या बाजूला काही हुजरे, अधिकारी मंडळी चूपचाप उभी होती. शाळेत दिपोटी आल्यावर होतं तसं वातावरण होतं. आम्ही हुजऱ्याच्या सूचनेप्रमाणं पादत्राणं बाहेरच्या एका खोलीत काढून ठेवली आणि हुजऱ्याबरोबर निघालो. माजघर, स्वयंपाकघर, बैठकीची खोली असा घराचा नकाशा आणि राजवाड्याचा नकाशा यात जमीन अस्मानाचं अंतर असतं. सेंट्रल पॅलेसच्या तळमजल्यावर खाजगी दरबार हॉल, खास दरबार हॉल, मॅरेज हॉल व इतर एकदोन दालनं एवढाच व्याप होता. परंतु प्रत्येक हॉलला जोडणारी लॉबी फार मोठी होती. जणू राजवाड्यात या दिवाणखान्यातून त्या दिवाणखान्यात जायचं ते लवाजमा बरोबर घेऊनच !

खाजगी दरबार हॉलचा आठ फूट उंचीचा दरवाजा चांदीचा आहे. वरच्या बाजूला चामुंडीची मूर्ती कोरलेली आहे आणि दरवाजाच्या प्रत्येक गंधवालामध्ये दशावतार कोरलेले आहेत. हुजऱ्यानं ढकलताच हा जड चांदीचा दरवाजा अल्लाउद्दिनाच्या गुहेवरील शीलेप्रमाणं सावकाश उघडला आणि आमच्या दृष्टीसमोर एका वैभवशाली दृश्य उघडं झालं. अजंठा-वेरुळ येथील

नक्षीदार भव्य खांबासारखे आडवे चार खांब आणि लांबीला उभे अकरा खांब असा या दालनाचा मोठा विस्तार आहे. प्रत्येक खांबामध्ये दहाबारा फुटांचं अंतर सहज असेल. ते स्टील पोलादाचे बनविले असल्यानं टिचकी मारताच या खांबातून पोकळ आवाज घुमतो. सगळ्या खांबांना सोन्याचा मुलामा चढविल्यामुळं तर दिवे नसतानादेखील ऐश्वर्याचा लखलखाट भरून राहिल्यासारखा वाटतो.

" मधल्या दोन खांबांवरचं छत काचेचं आहे. त्यावर सुंदर नक्षी रंगविलेली आहे. भिंतीकडच्या दोन्ही बाजूंची छताची लांबच लांब पट्टी मात्र कोरलेल्या नक्षीदार टीकवुड लाकडाची आहे. खाजगी दरबार हॉलच्या दुसऱ्या टोकाला मखमलीचे पडदे सोडून आतल्या बाजूला स्त्रियांसाठी बैठकीची व्यवस्था केली आहे. या ठिकाणी छतात एक गोल घुमट केलेला आहे. या घुमटाखाली प्रतिवर्षी गणपती उत्सव साजरा केला जातो. स्वतः महाराज गणपतीची पूजा करतात . . ." हुजऱ्या सांगत होता. आप्पा मला हळूच म्हणाले, " त्याला कॉमेंटरी जरा मोठ्यांदा लावायला सांग. " मी तशी सूचना करताच आणखीच आवाज खाली करून हुजऱ्या म्हणाला, " राजा झोपलाय—"

खाजगी दरबार हॉलमध्ये श्री. वेंकटप्पा या चित्रकाराचं, ' शकुंतला–कण्व निरोप ' हे मोठं चित्र आहे. या चित्राच्या समोरच्या भिंतीतच जो रोजवुड लाकडावर हस्तीदंती नक्षी बसवलेला दरवाजा आहे, तो सरळ महाराजांच्या खास दरबारात उघडतो. हस्तीदंती नक्षीत कालियामर्दनाचा देखावा सुंदर कोरलेला आहे. या दरबारातून दरबार हॉलमध्ये प्रवेश केल्यावर दरबार हॉलच्या पहिल्या भव्य दर्शनानं मन चकित होतं. पावलं

जागच्या जागी थबकतात. इंद्रसभा ती याहून दुसरी काय असणार?

या दरबार हॉलचे दोन भाग पाडलेले होते. एका भागात सोन्याचा मुलामा दिलेले भव्य खांब उभे होते. त्यांच्या आडव्या–उजव्या रांगा पाहून मदुरेच्या हजार स्तंभी सभामंडपाची आठवण होत होती. दरबार हॉलवरचं प्रचंड लांबीरुंदीची सीलिंग तोलून धरण्यासाठी खांबांची योजना शिल्पकारानं केली होती. परंतु त्यामुळं एकंदर हॉलला विलक्षण भव्यता आली होती. खांबांचा भाग संपल्यावर, हॉलच्या मध्यभागी महाराजांचं सिंहासन मांडलेलं होतं आणि सिंहासनाच्या दोन्ही बाजूंनी राजकारभाराशी संलग्न असलेल्या मुलकी–लष्करी खात्यातील अधिकाऱ्यांसाठी बैठकीच्या जागा होत्या. या बैठकीच्या भागात खांब मुळीच नसल्यामुळं त्याची विशालता अधिकच वाढली होती. बैठकीचा भाग संपला तेथे खांबांच्या सात मोठ्या कमानी होत्या. या कमानीपाशी उभं राहून खालच्या विस्तीर्ण पटांगणाकडे नजर टाकली की लक्षात येत होतं, आपण दुसऱ्या-तिसऱ्या मजल्याइतक्या उंचीवरून खाली पाहत आहो !

दसऱ्याच्या दिवशी अजूनही महाराज पूर्वीच्याच वैभवात सिंहासनावर बसतात. मुलकी, लष्करी अधिकाऱ्यांनी बैठकीची विस्तीर्ण जागा अजूनही तशीच भरते आणि खालच्या पटांगणात प्रजाजनांची गर्दी जमते. आम्ही दरबार हॉलमधून फेरफटका मारून परतलो तो एक कावळा झुंबरावर येऊन बसला होता आणि कर्कश ओरडत होता. दरबार हॉलमध्ये पलीकडच्या शय्यागृहात महाराज दुपारची वामकुक्षी घेत होते. याची त्याला कुठून कल्पना ? हुजऱ्या म्हणाला, " लई त्रास देतात ही पाखरं. " खुल्या पटांगणातील बाजूला खांबाच्या कमानीवरून मोठे, काळे

पडदे सोडले होते. ते पाखरं आत येऊ नयेत म्हणूनच ! दरबार हॉलमधून बाहेर पडण्यापूर्वी खांबांच्या पाठीमागच्या भिंतीवर देवतांची तैलचित्रं लावलेली होती. ती पाहिली. राजराजेश्वरी गायत्रीदेवी, भुवनेश्वरी, चामुंडी अशी ती चित्रं दरबारच्या कलावंतांनी काढलेली होती. त्यातलं रविवर्म्याचं सीता-स्वयंवराचं चित्र मला फार आवडलं. नेहमीच्या चित्रात उपवर सीता हातांत माळ घेऊन रामाच्या गळ्यात ती घालण्यास अधीर झालेली चित्रकार दाखवितात. पण रविवर्म्यानं या चित्रात सीता दाखविली आहे ती एक चिमुकली परकरी पोर ! आणि रामाच्या पराक्रमाकडे पाहून त्याच्यावर लुब्ध होण्याऐवजी आपला पिता जनक याच्या वस्त्रात तिनं लाजून आपलं तोंड अर्धं लपविलं आहे. ती पाहत आहे मात्र धनुष्य मोडून उभ्या राहिलेल्या रामाकडे !

चित्रांची खरी लयलूट दरबार हॉलपलीकडे असलेल्या 'मॅरेज हॉल' या ठिकाणी केलेली आहे. मॅरेज हॉलकडे जाणाऱ्या लॉबीच्या भिंतीवर म्हैसूरच्या दसरा महोत्सवातील मिरवणुकीचे निरनिराळे देखावे रंगविलेले आहेत. उंटस्वार, नौबतीचा श्रृंगारलेला हत्ती, बंदूकवाले, झिल्लो घोडे वगैरेंची चित्रं आहेत. म्हैसूरचे पहिले लष्करी बटॅलियन, पॅलेस इनफन्ट्रीतल्या सैनिकांचे हिरवे कोट, लाल विजारी वगैरे सर्व दलांची चित्रं नागराजू आणि सुब्रह्मण्य राजू या चित्रकारांनी रंगविवेली आहेत. खुद्द मॅरेज हॉलच्या तिन्ही बाजूंच्या भिंतीवर महाराज, युवराज आणि त्यांचे दिवाण वगैरेंसह निरनिराळ्या प्रसंगींच्या मिरवणुकींचे देखावे सुंदर रंगविलेले आहेत. या चित्रांतलं वैशिष्टय म्हणजे त्या त्या वेळच्या दिवाणांची, सेनापतींची आणि लहानमोठ्या ऑफिसर्सची हुबेहूब चित्रं रंगविलेली दिसतात. फोटोग्राफरप्रमाणं अनेक व्यक्तींचं

साम्य ठेवून समूह-चित्र काढणं ही गोष्ट अवघड असली पाहिजे. या 'वेडिंग दरबाराच्या' मध्यभागी उंच घुमट आहे. अनेक चमकणाऱ्या कळसांचं एक भलं मोठं झुंबर या घुमटाच्या मध्यभागी लटकलेलं आहे. विवाहित वरवधूंना बसण्यासाठी दोन्ही बाजूंना सिंह कोरलेलं चांदीचं सिंहासन आहे.

मॅरेज हॉल पाहिल्यावर राजवाड्याच्या तळमजल्यावर पाहण्यासारखा एकच भाग आहे. तो म्हणजे गोंबे तुट्टी. या विभागात निरनिराळ्या मूर्ती ठेवलेल्या आहेत आणि विशेष म्हणजे महाराजांची नऊ मण वजनाची सोन्याची अंबारी तेथे ठेवलेली आहे. ही अंबारी म्हणजे हत्तीच्या पाठीवरचा चिमुकला रथच ! आणि कित्येक वर्षं ही अंबारी पाठीवर वाहून दरबारच्या मिरवणुकीत इतमामानं मिरवत अखेर जो दिवंगत झाला, त्या गजराजाचं प्रचंड मस्तक पेंढा भरून ठेवलेलं आहे.

ती अंबारी आणि तो हत्ती पाहून मला एकदम आठवण झाली. मी आप्पांना विचारलं, " आपला हत्ती रिझर्व केला आहे ना ? " नेहमी सिनेमाची तिकिटं रिझर्व करण्याची सवय असलेले आप्पा माझ्या प्रश्नानं गोंधळले. पण मग त्यांच्या लक्षात आलं की, उटकमंडच्या वाटेवर मृदुमलाई येथील अरण्यात रानटी पशू पाहण्यासाठी हत्तीवर बसून जाण्याचा आमचा बेत होता आणि त्यासाठी, आधी हत्ती रिझर्व करणं भाग होतं. आप्पांनी उत्तर दिलं, " हो तर ! मी कालच फॉरेस्ट ऑफिसरला पत्र टाकलंय. तुला हत्तीवर बसायला नक्की मिळेल. " मृदुमलाईच्या अरण्यातल्या 'एलिफंट राईड' चा एखाद्या लहान मुलाच्या उत्सुकतेनं मी ध्यास घेतला होता खरा !

गोंबे तुट्टीतून बाहेर पडल्यावर माझ्या लक्षात आलं की,

आमच्याप्रमाणं आणखीही काही मंडळी राजवाडा पाहत हिंडत होती. मी आप्पांना म्हटलं, " पुण्याकडचे बरेच संस्थानिक राजवाडा पाह्यला आलेले दिसतात."

सेंट्रल पॅलेस पाहून बाहेर पडल्यावर त्या ऐश्वर्याच्या दृश्यानं डोळे दिपून गेले होते. त्यापेक्षाही राजवाडा बांधणाऱ्या शिल्पकाराच्या कलेचं कौतुक वाटत होतं. म्हैसूरमधले हे चारी राजवाडे आता या शहराच्या वैभवात भर टाकीत आहेत, हे खरं असलं, तरी त्यात राहणाऱ्या महाराजांच्याबद्दल मला कुतूहल वाटत होतं. सुवर्णाचा मुलामा चढविलेल्या दरबार हॉलमधून हिंडताना " महाराजांचं गरीबांकडं लक्ष नाही." हे हुजऱ्याचे उद्‌गार ऐकून मला वाईट वाटलं होतं. . . .

वृंदावन गार्डन्सहून म्हैसूरला आम्ही दुपारी आलो आणि श्री. बेटय्या यांनी आमच्यासाठी रिझर्व्ह केलेल्या हॉटेलवर उतरलो. ती डिसेंबरची चार तारीख होती, पण म्हैसूरमधला तो पहिला दिवस फार वाईट गेला होता. पहिलं कारण असं की, पुण्याहून घरच्या खुशालीची रोहिणीची तार मिळाली नव्हती. दुसरं कारण हॉटेलमधली व्यवस्था फारच वाईट होती. या हॉटेलात पुढचे तीन दिवस घालविणं अशक्यच होतं. संध्याकाळी मनाची बेचैनी घालविण्यासाठी हॉटेलजवळच असलेल्या प्राणिसंग्रहालयात आम्ही फेरफटका केला, तेव्हा एकंदर वातावरण असं बिघडलं की आमची अस्वस्थता वाढली मात्र. आभाळ एकाएकी भरून आलं आणि संध्याकाळच्या गुलाबी हवेत काळोख कालविला गेला. पिंजऱ्यात पाखरं गुपचूप होती. त्यांच्यापुढं ठेवलेल्या भाताच्या गारगोट्या झाल्या होत्या. वाघ, सिंह, माकडं, साप अंधेऱ्या कोपऱ्यात दडून बसले होते. हत्ती उभे होते ते देखील

विमनस्क. कालव्याच्या काठावर उगवलेल्या निबर लव्हाळ्याच्या पेंड्या सोंडेनं उचलून तोंडापर्यंत नेऊन त्या ते फेकून देत होते. अगदी आमच्या सारखीच त्यांची अवस्था होती—

" आम्ही एक हॉटेल बदलू. " मी आप्पांना म्हटलं, " पण या मुक्या जनावरांना हे कदान्न खातच दिवस कंठायला हवेत–"

आणि मग आमच्या उरल्या सुरल्या उत्साहावर पाणी पाडण्या-साठीच की काय एकाएकी पाऊस पडू लागला. बाहेर रस्त्यावर उभी असलेली मोटार गाठीपर्यंत पावसानं आम्हांला भिजवून टाकलं. आम्ही हॉटेलवर परतलो. पुण्याहून मुलांची तार आली नव्हती.

ती सबंध रात्र एका कोंदट खोलीत तारवाल्याच्या हाकेची वाट पाहत आम्ही घालविली. मुलं ठीक असतील ना, आमचे प्रिय मित्र डॉक्टर रामराव राहतेकर आम्ही पुणं सोडलं तेव्हा फार आजारी होते. त्यांची प्रकृती कशी असेल–अशा अनेक काळज्यांमुळं मन खचत होतं. मंगळवार, तारीख पाच उजाडली.

या हॉटेलमधला बाडबिस्तरा हलविण्याचा निश्चय करून आम्ही सकाळी बाहेर पडलो. धन्वंतरी रोडवर ' हॉटेल इंद्रभवन ' अशी एका मोठ्या इमारतीवरची पाटी वाचून आत शिरलो. समोरच मॅनेजरचं ऑफिस दिसलं. ऑफिसच्या काउंटरमागे भिंतीवर चामुंडी, दत्त, गणपती वगैरे देवतांचे फोटो होते. उद-बत्त्यांचा सुवास दरवळत होता. मॅनेजर मोठा शुचिर्भूत होऊन बसलेला दिसला.

त्यानं दाखविलेली खोली आम्हांला एकदम पसंत पडली. खोली फार मोठी होती. उत्तम सजविलेली होती. खोलीमागे बाथरूम वगैरे स्वतंत्र सोयी होत्या. खोलीत दोन सोडून तीन

पलंग होते. आणि रोज माणशी दहा रुपये म्हणजे पहिल्या हॉटेलच्या मानानं फारच कमी दर होते. दहा वाजण्याच्या आत नव्या हॉटेलात सामानसुमान लावून आम्ही इडलीडोसाचा ब्रेकफास्टही उरकला होता. म्हैसूरच्या प्रवेशात सुरू झालेला प्रवासाचा दुसरा अंक सपशेल पडणार अशी आदल्या रात्री वाटणारी भीती नाहीशी झाली होती. आता फक्त पुण्याची तार आली, सर्वांची खुशाली कळली की उरलेली रुखरुख नाहीशी होणार होती.

दुपारी अडीच वाजता चामुंडीच्या दर्शनाला जाण्याचा बेत एकदम ठरला. माझ्या मनाच्या अवस्थेमुळं मला तो एकदम आवडलाही.

चामुंडीचं मंदिर शहरापासून दहा मैल अंतरावरच्या एका उंच टेकडीवर बांधलेलं आहे. मोटारीचा रस्ता वळण घेत घेत सरळ टेकडीच्या माथ्यावर जातो आणि मंदिराच्या आवारात शिरतो. आमची मोटार मंदिराच्या आवारात शिरताच पांढऱ्या कण्हेरीसारख्या फुलांचे हार घेऊन लहान पोरी धावत गाडीशी आल्या. आवारात पूजा-साहित्याची दुकानं होती. बालाजीनं पळत जाऊन नारळ, कापूर, उदबत्ती आणि एक भटजी पण आणला. साऱ्या तयारीनिशी आम्ही देवळात गेलो. पाहतो तो गाभाऱ्याच्या लोखंडी दरवाजाला भलं मोठं कुलूप !

शकून अपशकुनावर विश्वास नसताही माझं मन चरकलंच. चौकशी करताना कळलं की देवीचं मंदीर अडीच वाजता बंद होतं. संध्याकाळी पाच वाजता उघडतं.

आता अडीच तास चामुंडीच्या दाराशी ताटकळत बसण्याखेरीज गत्यंतर नव्हतं. शेवटी तेवढ्या वेळात मंदिराजवळचाच राजेंद्रविलास राजवाडा आम्ही पाहून घेतला. चामुंडीचा निम्मा

घाट खाली उतरून म्हैसूरचा प्रख्यात नंदीही पाहिला. एका काळ्याभोर खडकात कोरलेला, सतरा फूट उंचीचा, तेवीस फूट लांबीचा खुरमांडी घालून बसलेला हा नंदी बंगलोरच्या नंदीची प्रतिकृतीच होती. बंगलोरचा नंदी देवळात आहे, तर हा नंदी टेकडीच्या कुशीत उघड्यावर आहे एवढाच फरक! एवढा कार्यक्रम आटोपून वाटेत माकडांना चिक्कू चारण्याचा खेळ करीत आम्ही पुन्हा चामुंडीच्या देवळात गेलो. तेव्हा साडेचार वाजले होते. अजून अर्धा तास मोटारीच्या कोंदट, गरम हवेत बसून काढणं भाग होतं आणि चहाची पण विलक्षण तल्लफ आली होती. बालाजीनं पुजाऱ्याच्या घरी जाऊन चहा बनवून आणला. चहा पिता पिता समोरच दुकानातल्या रेडिओवर कानपूरला चालू असलेल्या दुसऱ्या टेस्ट मॅचची कॉमेंटरी सुरू झाली. चहा प्यायला आणि कॉमेंटरी ऐकायला मिळाल्यावर आप्पांना दुसरं काय हवं होतं? मला मात्र पाच वाजतात केव्हा, दार उघडतं केव्हा आणि चामुंडीमातेचं दर्शन घडतं केव्हा अशी उताविळी लागून राहिली होती.

शेवटी एकदाचं दार उघडलं. पूजेचं साहित्य आणि हार हातांत घेऊन आम्ही सभामंडपात शिरलो. देवीच्या गाभाऱ्यासमोर उभे राहिलो. आमच्या आजूबाजूला इतर बरीच माणसं जमली. हातांत पंचारती घेऊन एक उंचनीच पुजारी आमच्यासमोर येऊन उभा राहिला. आरतीत पैसे टाकण्यासाठी माणसं आपापल्या खिशातून चिल्लर नाणी काढण्यात गुंतली. पैसे टाकले तरच पूजा होईल, असं आमचा भटजी खुणावू लागला. पैशाची देवाण-घेवाण आटपते न आटपते तो एकच गलका सुरू झाला. कुणी घंटा वाजविली, कुणी मोठ्यांदा नामस्मरण केलं कुणी पुढं घुसू लागले.

मी डोकडोकावून पाहिलं तेव्हा मला चामुंडीचं दर्शन घडलं. म्हणजे दर्शन चामुंडीचं घडलंच नाही. तिच्या अंगावर घातलेल्या सोन्याच्या अनेक अलंकारांचं दर्शन घडलं. जिवाशिवाजी भेट अखेर घडलीच नाही. हिंदू देवालयातही देवदर्शनाची ही पद्धत किती लाजिरवाणी आहे! अशा वातावरणात परमेश्वराचं दर्शन, चिंतन काही घडणंच अशक्य. यापेक्षा ख्रिस्ती किंवा मुसलमानी मंदिरातली स्तब्धता, एकान्त परमेश्वर चिंतनाच्या दृष्टीनं अधिक अनुकूल वाटतो.

चामुंडीच्या मंदिराबाहेरच्या आवारात दहा फूट उंचीचा, हातात तरवार घेतलेला, जीभ तोंडाबाहेर काढून रक्त चाटणारा एक राक्षसाचा पुतळा दिसतो. पूर्वी केव्हा पुराणकाळी याच महिषासुर नावाच्या राक्षसानं म्हैसूरच्या जनतेची छळणूक चालविली होती, त्याचा वध करून चामुंडीनं जनतेला जीवदान मिळवून दिलं होतं. महिषासूर नावावरूनच सध्याचं म्हैसूर हे नाव पडलं म्हणतात.

श्रीरंगपट्टणच्या रंगनाथ मंदिरातील देवदर्शनाचा आमचा अनुभव मात्र थोडा वेगळा होता. एकतर जिच्या आवारात मोठमोठ्या मोटारी उभ्या राहतात, त्या चामुंडीच्या श्रीमंतीचं वैभव रंगनाथाच्या आसपास नाही. म्हैसूरपासून दहा मैलांवर कावेरी नदीच्या दोन प्रवाहांच्या विळख्यात सापडलेलं श्रीरंग-पट्टण टिपू सुलतानाच्या वेळी वैभवाच्या शिखरावर असलं तरी आता निद्रिस्त, शांत असं एक बेट उरलं आहे. त्या वेळचं वैभव काळाच्या उदरात नाहीसं होऊन उरल्या आहेत फक्त खुणा. राजकीय वादळात टिपू, हैदरची सत्ता नष्ट झाली. इंग्रजांचं वर्चस्व आलं, इंग्रज गेले आणि आता स्वातंत्र्याचे वारे वाहू लागले.

श्रीरंगपणट्टचा इतिहास बदलला, राज्यकर्ते बदलले. बदलला नाही फक्त रंगनाथ मंदिराच्या अंधाऱ्या गाभाऱ्यात उशाशी हात घेऊन पहुडलेला पुरुषोत्तम रंगनाथ ! आठशे वर्षांपूर्वी बांधलेल्या भव्य, दगडी मंदिरात, वेरुळ-अजिंठ्यातील लेण्यांत असावी तशी खोल शांतता आहे. बाहेर उन्हं रणरणत असली तरी वर्षानुवर्षं मस्तकावर रंगनाथाच्या मंदिराचं ओझं वाहणारे खांब शीतल वाटतात.

बाहेरच्या प्रशस्त सभा मंडपात एक ब्राह्मण कारकून बसलेला दिसला. त्याच्यासमोर एक पाटी लावलेली होती—रंगनाथाच्या पूजेचे दर पाटीवर छापलेले होते. चार आण्यांपासून पन्नास रुपयांपर्यंत पूजा ठरविता येण्याची सोय होती. आठ आण्यात तीर्थ, पन्नासदा नामस्मरण वगैरे. दीड रुपयात विष्णुसहस्रनाम अशी पूजेची चढती भांजणी होत गेली होती.

आम्ही दीड रुपाया भरून पावती फाडून घेतली. एक इसम दोन आणे अशी हॉटेलात शेवटी पुकारतात तशी मंदिराच्या गाभाऱ्यात आम्ही प्रवेश करण्यापूर्वीच कारकुनानं पुजाऱ्याला दीड रुपायाच्या पूजेची आरोळी ठोकली. आम्ही गाभाऱ्यात गेलो. अंधारात काहीच दिसत नव्हतं. पुजाऱ्यानं समई पेटवली· एकीकडे घडघड विष्णु सहस्रनाम म्हणता म्हणता हातातल्या समईचा उजेड अनंतशयन विष्णुच्या अंगावर तो पाडू लागला. एका हाताची बोटं कानशिलावर टेकलेली, आडव्या देहाचा भार कोपरावर तोलून धरलेला, अगदी सहजपणे लांब सोडलेले पाय एकावर एक ठेवलेले, मिटलेले कमलनेत्र, सरळ नासिका, धनुष्याची टोकं उचलल्याप्रमाणं दिसणारी हसरी जिवणी हे काळ्या पाषाणातलं विष्णुचं अनलंकृत ध्यान मी पाहतच राहिले. भट-

जींना म्हणावंसं वाटलं, " अहो हळू. स्वामींची झोपमोड होईल. मला एकदम सेंट्रल पॅलेसमध्ये आराम करणाऱ्या कृष्णराज वडियारची आठवण झाली. गरीबांना, दुःखितांना वाटत असेल, ही झोप संपणार कधी ?

रंगनाथाच्या मंदिराबाहेर पडण्यापूर्वी तीर्थप्रसाद घेतला. चामुंडीच्या मंदिरातून आदल्या दिवशी आम्ही बाहेर पडलो. तेव्हा माझी चिंता संपली नव्हती. त्याच संध्याकाळी पुण्याला ट्रंककॉल केला होता. फोनवर रोहिणीचा आवाज ऐकला. डॉक्टरांची खुशाली समजली, आमची राणी कुत्री ठीक आहे, असं कळलं तेव्हाच आमच्या काळजावरचा भार हलका झाला होता. आता देवाजवळ काही मागण्याजोगं नव्हतं. मागायचे होते फक्त आशीर्वाद. तेवढे घेऊन पुन्हा एकदा ते सुभग दर्शन घेऊन आम्ही रंगनाथाच्या मंदिराबाहेर पडलो.

श्रीरंगपट्टणमध्ये सकाळच्या त्या दोन प्रहरात पाहण्याजोगी दोन-तीन ठिकाणे आम्ही पाहून घेतली. टिपू सुलतानाचा समर-पॅलेस ' दर्या दौलत ' पाहिला. दर्यादौलतमधील लाकडी कोरीव कामानं सुशोभित केलेली दालनं फार आवडली. सिमेंट कॉंक्रीटच्या ठोकळेवजा बंगल्याऐवजी असं नक्षीदार, रंगीत लाकडी घर आपण बांधायला हवं होतं, असं वाटलं. पण विशेष नजरेत भरली ती दर्यादौलतच्या व्हरांड्यांतील भिंतीवरची म्यूरल्स. म्हैसूरच्या लढाईचे, टिपूच्या वाढदिवसाचे प्रसंग भिंतींवर चितारले, त्याला दोन अडीचशे वर्षं सहज लोटली असतील, परंतु चित्रकारानं वापरलेला पांढरा रंग अजून बगळयाच्या पाठी-प्रमाणं तकतकीत टिकला आहे. दर्यादौलतच्या दुसऱ्या मजल्या-वरील दालनातून काचेच्या केसेसमध्ये विजेच्या दिव्याचा वरून

उजेड पडावा, अशा बेतानं काही सुंदर कॉपर-प्लेटवरील एचिंग्ज आणि टिपूच्या मुलांची शरणागति व त्यांचे पोर्टेटस मांडले आहेत. दर्यादौलतमधून बाहेर पडण्यापूर्वी तेथील क्यूरेटर नारायण अय्यंगार यांची भेट घेतल्यावर आप्पांनी त्याचं प्रथम अभिनंदन केलं, ते चित्रांवरील प्रकाशयोजनेबद्दल. टिपू सुलतानाला दाढी का नव्हती, त्याचा पोषाख बाराबंदी पागोटं असा ब्राह्मणी का होता, टिपू हैदरचा राजा होता की फक्त सेनापती, अशा अनेक शंका आम्ही नारायण अय्यंगारांना विचारल्या आणि मग म्हैसूरच्या हिंदू राजाच्या पदरी साधा सैनिक असलेला टिपूचा बाप हैदर स्वपराक्रमानं सेनापती कसा बनला, दुबळ्या राजाला बाजूला सारून त्यानं गादीचा ताबा घेतला, त्या राज्याचा वारसा टिपूकडे कसा आला वगैरे रोमांचकारक इतिहास सांगून नारायण अय्यंगार म्हणाले, " राज्य टिकविण्यासाठी जनता संपर्क साधला पाहिजे. प्रजेचा विश्वास आणि प्रेम संपादन केलं पाहिजे ही गोष्ट हैदर आणि टिपू जाणून होते. टिपूची आई आणि हिंदू दिवाण पूर्णय्या यांची पत्नी दोघी मैत्रिणी होत्या. हिंदू धर्माविषयी आदर बाळगण्याची शिकवण टिपूला मिळाली होती." नारायण अय्यंगारनी या पितापुत्रांच्या आयुष्याचा चित्रपट आमच्यासमोर उभा केला

काही वेळानं आम्ही टिपू, हैदर आणि टिपूची आई यांच्या समाधीसमोर उभे राहिलो. तेव्हा चित्रपट पुन्हा आमच्या डोळ्यांसमोरून सरकू लागला....म्हैसूरच्या त्या चार लढाया, श्रीरंगपट्टणची शेवटली लढाई, किल्ला लढविता लढविता झालेलं टिपूचं देहावसान, मीर सादिकची फितुरी–सारं सारं आठवलं. कित्येक वर्षं ज्या अंधार कोठडीत इंग्रज कैद्यांना टिपूनं कोंडून

ठेवलेलं होतं आणि आता उद्‌वस्त अवस्थेत पाहूनही आमचं मन अस्वस्थ होत होतं ती कोठडी आठवली. धारातीर्थी पतन पावलेल्या आत्म्याला शांती मिळते म्हणतात; परंतु ज्यांचं स्वप्न अपुरंच राहिलं, थकल्यामुळं झोपेत असताच जो मारला गेला, त्या पराक्रमी टिपूच्या आत्म्याला शांती मिळणं कठीण होतं . . .

काहीशा अस्वस्थ मनानंच आम्ही या इतिहासप्रसिद्ध शहराचा निरोप घेतला. आणि अर्ध्या तासाच्या आत दुपारच्या जेवणासाठी इंद्रभवनवर परतलो.

म्हैसूरच्या चार दिवसांच्या मुक्कामात शक्य होतं तेवढं सारं आम्ही पाहिलं होतं. काही खरेदी करायची नाही, असं ठरविलं तरीदेखील म्हैसूर आर्ट एम्पोरियमवर गेलो होतो. पाचपन्नास रुपये खर्चले गेले. पण एक सुंदर कलावस्तू भांडार पाहिल्याचं समाधान मिळालं होतं. इंद्रभवनातला संभार-भात मला इतका आवडला होता की, मार्केटमध्ये जाऊन मी संभार-मसाला, पापड खरेदी केले होते. म्हैसूरच्या प्रशस्त रस्त्यांत आम्ही भटकलो होतो. चौकातले सुंदर पुतळे पाहत रेंगाळलो होतो.

आठ तारखेला सकाळी आठाच्या सुमाराला आम्ही इंद्रभवन हॉटेल सोडलं व उटीला जायला निघालो.

माझ्या पद्धतीप्रमाणं मी क्षणभर खोलीपुढं रेंगाळले. इतक्यात एक परिचित घंटानाद ऐकू आला. मी गॅलरीशी जाऊन पाहिलं तो खाली रोज सकाळी आपली सोंड वर करून बक्षिसी घेणारा ‘रंगा’ गजराज सोंड वर करून उभा होता. माझ्या डोळ्यांत पाणी उभं राहिलं. रंगाचा नव्हे, म्हैसूरचा–हा निरोपाचा नमस्कार मी कधी विसरणार नाही !

• • •

मुंबई शाखा

## ३

# निलगिरीची राणी--उटी !

एका मोठ्या लाकडी, काळ्या फलकावर पांढऱ्या अक्षरांत लिहिलेली ती यादी मोठ्यांदा वाचण्यात आप्पांना काय गंमत वाटत होती, कोण जाणे ! रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी झुलणाऱ्या दाट वेळूंच्या बनाकडे पाहण्यात गुंतलेली मी आप्पांच्या घडाघड वाचनामुळं एकदम वळून त्यांच्याकडे पाहू लागले. हे काय आरंभलंय तुम्ही, असं विचारून त्यांच्याजवळ जाऊन उभी राहिले. परंतु माझ्याकडे संपूर्ण दुर्लक्ष करून त्यांचं घडाघड वाचन सुरूच होतं–' हत्ती ३७२, गवे रेडे १३७८, वाघ १०, चित्ते १२, अस्वलं ३४, रानडुकरं १३७, सांबरं १९१, चित्तळं १००१, कोल्हे २, साळिंद्रं १३, उडत्या खारी २, रानमांजरं २, ससे २१, घोरपडी ६ आणि माकडं २०३६.'

सारी यादी पूर्ण वाचून झाल्यावर आप्पा मला म्हणाले, " या

वन्य पशूंची इतकी निश्चित गणना या लोकांनी केली कशी? चित्तळ सुमारे एक हजार असं न लिहिता नक्की एक हजार एक असा आकडा यांनी ठरविला कसा? माकडं सुमारे २००० न म्हणता २०३६ अशी निश्चित कशी ठरविली? देशातल्या लोकांची शिरगणतीदेखील इतक्या ठामपणे करता येत नाही. मग हे अरण्यातले वन्य पशू काय यांच्यापुढे हजर झाले आणि म्हणाले, 'मोजून घ्या आमची संख्या!'"

मलासुद्धा फळ्यावरचे ते निश्चित आकडे पाहून नवल वाटलं होतं. म्हणे, २१ ससे! पण मोजणारानं पाठ फिरविण्याच्या आत त्या २१ चे २१० व्हायला काय उशीर होता?

आम्ही दोघांनी ठरविलं की आता फॉरेस्ट रेंजर भेटला की त्याला आमची शंका विचारायची, पण फॉरेस्ट रेंजर–ज्याला मी 'जंगल जिम' नाव ठेवलं होतं तो काही केल्या बोलावणं धाडलं तरी येईना.

कारगुडी येथील दाट अरण्यातल्या फॉरेस्ट रेंजरच्या कचेरीत आम्ही त्याची वाट पाहत होतो. पण या सुंदर बांबूच्या झोपडीला कचेरी असं रुक्ष नाव देण्याऐवजी पर्णकुटी किंवा आश्रम असंच नाव शोभलं असतं. ती वेळ सकाळची दहा वाजताची होती. तरी हवेतला पहाटेचा थंडपणा कमी झाला नव्हता. पाऱ्यासारखी लकाकणारी सूर्याची किरणं पाखरांच्या थव्याप्रमाणं झाडांच्या शेंड्यावर बसून चमकत होती. वेळूच्या झुलत्या बनावरून घसरत होती. एखाद्या पक्ष्याच्या स्वरानं अरण्यातल्या त्या प्रसन्न हिरव्या शांततेला वाचा फुटे तेवढीच!

म्हैसूर शहरातलं–विशेषतः इंद्रभवन हॉटेलातलं गजबजलेलं वातावरण सोडून आम्ही उटकमंडच्या रस्त्याला लागलो. तेव्हा

कल्पना नव्हती की उटकमंडला नेणारा रस्तादेखील इतक्या रम्य वनश्रीतून जात असावा. नऊ वाजण्याच्या सुमाराला गुंदलपेट या चिमुकल्या गावात आमची मोटार शिरली आणि रंगभूमी-वरचा पडदा वर जाऊन समोर क्षितिजावर निळचा डोंगराची तिहेरी रांग एकदम दिसू लागली, तेव्हा "आहा!" असा उत्स्फूर्त उद्गार आमच्या तोंडून बाहेर पडला होता. प्रत्येक रांगेमध्ये धुक्याचा विरल पडदा दिसत होता. रस्त्याला उतार होता. दोन्ही बाजूंनी झाडं उभी होती आणि त्यांच्या फांद्या जुळून रस्त्यावर कमानी झाल्या होत्या. रस्त्याच्या डाव्या उजव्या बाजूला हिरवीगार शेतं सळसळत होती. मधूनच नारळीची दाट बनं दिसत होती.

कोपालस्वामी नांवाचं खेडं मागं टाकून आमची मोटार वेगानं धावू लागली. तेव्हा तिच्या चाकाखाली साटणीच्या रिबनसारखा रस्ता उलगडत होता. पर्वतांच्या रांगा जवळजवळ येऊ लागल्या होत्या. रस्त्याच्या दोन्ही बाजूंची 'टीक'ची दाट झाडी वाढत होती. म्हैसूरपासून बेचाळीस मैलांवर सरहद्दीवरच्या बंडीपूर येथील फॉरेस्ट बंगल्यासमोर आमची मोटार थांबली होती, तेव्हा तर आजूबाजूला घनदाट अरण्य पसरलं होतं. किर्रर्र अरण्यात वाटावा तसा एकटेपणा वाटत होता. बंडीपूर सोडल्यावर रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी दाट बनं लागली. रस्ता निर्मनुष्य होता. बसेसची वाहतूकही या वेळी नव्हती. बांबूच्या हिरव्या जाळीतून डोकावणाऱ्या काळचा, गूढ छाया मनात हुरहूर निर्माण करीत होत्या.

तोच एक गुराचं खिल्लार रस्त्यातून निघालेलं दिसलं. त्यांत काही शिंगं न फुटलेली वासरं होती. काही पाड–कालवडी होत्या,

तर काही म्हातारे बैल होते. आचळं सुकलेल्या गायी होत्या. त्यांच्या गळ्याला बांधलेली आखूड दावी आणि मागं हातातला आसूड पाठीवर ओढणारे कळीकाळासारखे दिसणारे कसाई पाहून त्या खिल्लाराचं भविष्य मला उमगलं आणि माझा गळा दाटून आला.

डोळ्यांमध्ये वाळूचा कण सलावा तसं हे करुण दृश्य नंतर किती तरी वेळ माझ्या मनात सलत राहिलं. बांबूंची बनं विरळ झाली. तकतकीत पानांच्या, सडपातळ खोडांच्या, टीक वृक्षांच्या पलटणी दोन्ही बाजूंनी दिसू लागल्या. टीक झाडांची ही नवी लागवड केली असावी. एखादं वळण घेतल्यावर पर्वतांच्या रांगेतली मोठमोठी निळी शिखरं गळ्याभोवती धुक्याचा मफलर गुंडाळून बसलेली दिसत. पावणेदहाच्या सुमाराला आमची मोटार एका दगडी कमानीपुढं थांबली. कमानीवर ठळक अक्षरांत लिहिलेलं होतं—' वेलकम् टु मद्रास ! ' म्हैसूरची हद्द संपते तिथे पाटी होती, ' थँक यू ! व्हिजिट अस अगेन ! ' ' सुस्वागतम ' असं मद्रास राज्य स्वागत करीत होतं तर ' आभार, पुन्हा भेट द्या ' असा आगत्याचा निरोप म्हैसूर राज्यानं दिला होता. गेटावरच्या पोलिसानं रस्त्यावरचा आडवा बांबू वर उचलला आणि आम्ही मद्रास राज्यात प्रवेश केला.

आम्ही मद्रासच्या हद्दीत शिरलो आणि अर्ध्या तासाच्या मजेदार ड्राइव्हनंतर अभयारण्यमला पोचलो होतो. थोप्पेकाड, कारगुडी अशा गावांच्या पाट्या वाचत होतो खऱ्या, परंतु त्या गावांचा पत्ता नव्हताच. आत जंगलात कुठं तरी गावांची वस्ती असावी. आतासुद्धा कारगुडी येथील फॉरेस्ट रेंजरची ही कचेरी म्हणजे घनदाट जंगलात रस्त्याच्या कडेची एक पर्णकुटी एवढाच

अर्थ. या अरण्याचं नाव अभयारण्यम्. जंगली जनावरांसाठी हे अरण्य राखून ठेवलेलं आहे. ‘ मृदुमलाई वाइल्ड लाइफ सँक्चुअरी ’ असंही या ठिकाणाचं नाव आहे. येथे शिकारीला परवानगी नाही. जंगलात शिरून वन्य पशूंचं दर्शन घ्यावं अशी ज्या प्रवाशांची इच्छा असते, त्यांच्यासाठी हत्तीवरून जंगलातला फेरफटका करण्याची सोय सरकारकडून केली जाते. उटकमंडच्या सफरीत अभयारण्यातले वन्य पशु पाहणं हा एक आम्ही आखलेला मोठाच कार्यक्रम होता. परंतु हा कार्यक्रम पार पाडायचा असेल तर अगोदर वर्दी देऊन ठेवावी लागते. हत्ती रिझर्व्ह करून ठेवावा लागतो. अभयारण्यातील डाक बंगल्यात खोली राखून ठेवावी लागते. लंचडिनरची ऑर्डर द्यावी लागते. म्हणून तर आम्ही या ठिकाणी गाडीतून उतरून फॉरेस्ट रेंजरच्या कचेरीत दाखल झालो होतो.

परंतु ‘ जंगल जिम ’ कामानिमित्त कुठल्या तरी डेपोवर गेल्याचा निरोप कळला तेव्हा त्याच्या भेटीचा विचार सोडून आम्ही अभयारण्याच्या रेस्ट हाऊसवर गेलो. तेथील खानसाम्याला सांगून ठेवलं की, ‘आम्ही अमूक तारखेला सकाळी अकरा वाजता येऊ. आमच्यासाठी खोली आणि जेवण तयार ठेव. ’

एवढं काम आटोपल्यावर आम्ही उटकमंडच्या वाटेला पुन्हा लागलो. आता फक्त अडतीस मैलांचा प्रवास उरला होता. दोन्ही बाजूंचं अरण्य घनदाट होत चाललं होतं. कधी उंच उंच देवदारांची गर्दी दिसत होती, तर मधूनच बांबूच्या दाट बनांची भिंत उभी दिसे. म्हैसूर सोडल्यापासून जवळजवळ साठ मैल आम्ही चढतच होतो. परंतु उटकमंडचा ‘ घाट ’ अजून पुढंच होता आणि उटकमंडची खास निशाणी जे युकॅलिप्टस झाड त्याचीही भेट झाली नव्हती. जागोजागी रस्त्याच्या कडेला प्रचंड वारुळं दिसत होती.

कधी उजवीकडे तर कधी डावीकडे विस्तीर्ण खोऱ्याचा देखावा उघडा होत होता. या विस्तीर्ण खोऱ्यात आकाश खाली उतरून तुडुंब भरलेलं दिसे. त्यावरचा धुक्याचा थर आणि फेसाप्रमाणं तरंगणारे ढगांचे पुंजके पाहून मन चकित होई. पर्वतांची रांग तर समोर सारखी दिसतच होती. आता सूर्य पूर्ण वर चढला होता. तरीदेखील हवा अगदी, विरल, उल्हसित करणारी होती. ‘ मृदुमलाई ’ या काव्यमय नावाला साजेशीच या प्रदेशातली हवा होती खरी !

म्हैसूरपासून अडुसष्टाव्या मैलावर गुडालूर गाव लागलं. छोटंसं, फक्त एका बाजारपेठेचं ! समुद्रसपाटीपासून चार हजार फूट उंचीवर गुडालूर आहे. इथून उटकमंडचा घाट सुरू होतो.

परंतु घाट सुरू झाला म्हणजे छाती दडपणारी चढण सुरू झाली म्हणता काय ? मुळीच नाही. जम्मूपासून काश्मीरला जाताना जागजागी केसातल्या आकडचांसारखी वळणं आणि हजार हजार फुटांच्या चढणी आढळतात. त्या मानानं उटीचा घाट किती सोपा म्हणायचा ! डोळे फिरविणाऱ्या दऱ्या नाहीत किंवा अंगावर येऊ पाहणारे कडे नाहीत. अस्ताव्यस्त माजलेली जंगलं नाहीत. मोटार आस्ते आस्ते चढत होती. रस्ता इतका रुंद आणि गुळगुळीत होता की, पोटातले पाणीदेखील हलत नव्हतं. आणि घाट चढताचढता आजूबाजूच्या अत्यंत रम्य आणि नावीन्यपूर्ण सृष्टिशोभेकडे पाहावं तितकं थोडं वाटत होतं. सहा हजार फुटावर नाडुपट्टम खेडं लागलं. डोंगरमाथा जवळ आला. परंतु हिमालयाप्रमाणे त्याचे सुळके आभाळात शिरले नव्हते किंवा कडे तुटलेले नव्हते. जिकडे तिकडे पिरॅमिडसारख्या टेकडचा. काही नुसत्या हिरवळीनं माखलेल्या तर काही चहा-कॉफीच्या

हिरव्यागार मळ्यांनी झाकलेल्या. कॉफीच्या बुटक्या, गिर्रेबाज झुडुपांनी आच्छादलेल्या टेकड्यांचे माथे लुमुंबा अगर शोंबेच्या माथ्यांप्रमाणे दिसत होते. टेकडीमधल्या खोलगट भागातून कुठं सायप्रस, कुठं देवदार तर कुठं रानटी झुडपं टोळक्या टोळक्यांनी वाढलेली दिसत.

नाडुपट्टम गाव मागं टाकून आम्ही सात हजार फूट उंचीच्या पठारावर आलो. गुलाबपाणी मिसळल्यासारखी हवा एकदम प्रसन्न वाटू लागली. जणू चारी बाजूंनी खोऱ्यात डोकावणाऱ्या निळ्याशार आभाळाची निळाई आणि उतरणीवरच्या हिरवळीची व मळ्यांची थंडाई हवेतल्या झुळुकेत मिसळली होती. पैकारा नदीच्या धरणाला वळसा घालून आम्ही आणखी हजार फूट चढलो आणि उटकमंडचं सारं सौंदर्य आमच्या दृष्टीसमोर खुलं झालं !

'बहुरत्ना वसुंधरा' असं सुभाषित आहे. वसुंधरेचं दर्शन घडण्याइतका जगप्रवास मी केलेला नाही. परंतु कन्याकुमारीपासून काश्मीरपर्यंत प्रवास केल्यामुळं मला खचित म्हणता येईल की भारताची भूमी तरी किती बहुरत्ना आहे. म्हैसूरच्या जगन्मोहन चित्रमंदिरात 'भारतीय सुंदरी' अशा मथळ्याचं रविवर्म्याचं एक समूहचित्र आहे. केरळ, कुर्ग, आंध्र, कर्नाटक, महाराष्ट्र, गुजरात, बर्मा, काश्मीर, राजस्थान अशा विविध प्रांतांच्या स्त्रियांची विविध रूपं त्यांनी या चित्रात रंगविली आहेत. भारतीय सुंदरीऐवजी भारतीय वनश्री असा मथळा देऊन रविवर्म्यांनी प्रत्येक प्रांताच्या वनश्रीचं चित्र काढलं असतं तर भारतीय वनश्रीची विविध रूपं त्यांना रंगवावी लागली असती. मात्र हळदी कुंकवाच्या समारंभात

एखादी आंग्ल युवती विसंगत वाटावी तशी भारतीय वनश्रीत उटकमंडची निसर्गसुंदरी विसंगत वाटली असती. हिरवळीनं झाकलेल्या ठेंगण्या टेकड्या, मधल्या सखल भागात टोळक्यांनी वाढलेली झुंबरासारखी दिसणारी 'सायप्रस'ची झाडं आणि भरीला बिन वशिंडाच्या आणि कपाळावर शिंगाऐवजी केसांची झुलपं असलेल्या घाऱ्या डोळ्यांच्या, मोठ्या कासेच्या गायी—हा सारा थाट भारतीय खासच नव्हता. इंग्लंडमधल्या एखाद्या रम्य स्थळाच्या लँडस्केप चित्रात पाहिलेल्या वनश्रीची आठवण यावी, इतकी विलायती छाप उटीच्या निसर्गावर पडलेली असावी. या चमत्काराचं मला फार नवल वाटलं. गोऱ्या मडमेच्या अपरिचित सौंदर्याकडे कुतुहलानं पाहावं तसं उटीच्या नावीन्यपूर्ण वनश्रीकडे आम्ही कुतूहलाने पाहू लागलो. उटीच्या वाटेवर लागलेल्या पहिल्या निलगिरी वृक्षापाशी मोटार थांबवून आम्ही तो वृक्ष जवळून पाहिला. ही कर्पूराची झाडं दोन माणसांच्या कवेत न मावेल अशा प्रचंड बुंध्याची असतात. तशीच काश्मीरातल्या 'सफेता'च्या झाडासारखी सडपातळ खोडाची, उंच गेलेली, शेंड्यापाशी थोडी पालवी असलेली अशी असतात. कर्पूरांची पानं चिंचोळी, हिरवी, तकतकीत असतात आणि खोडांवरच्या आणि फांद्यांवरच्या साली सोलून काढल्यामुळं आतली कोवळी त्वचा दिसत असते. आठवण म्हणून आम्ही निलगिरीची एक डहाळी तोडून बरोबर घेतली. निलगिरीच्या दर्पानं मोटार भरून गेली. जणू निलगिरी तेलाची बाटलीच उपडी झालेली होती . . .

उटकमंडच्या ऐन वस्तीच्या प्रवेशद्वारातून आम्ही आत शिरलो आणि मग एका लहानशा टेकडीवरचा लहानसा लुटुपुटीचा घाट चढून आमची मोटार ' सेसील हॉटेल ' च्या आवा-

रात शिरली. निलगिरीच्या उंच उंच वृक्षांखालून गेलेल्या अर्ध-वर्तुळाकार रस्त्यानं सरळ पोर्चमध्ये जाऊन उभी राहिली. शंभर मैलांचा प्रवास संपला होता. तरीदेखील मोटारीवर धूळ साचलेली नव्हती. घामानं, धुळीनं आमचे कपडे भरले नव्हते किंवा प्रवासाचा किंचितही थकवा वाटत नव्हता. फक्त मनात एक गुप्त शंका डोकावत होती. हॉटेलच्या बाबतीत म्हैसूरला ' प्रथम-ग्रासे मक्षिकापात ' झाला, त्याची पुनरावृत्ती तर इथं होणार नाही ? म्हैसूरच्या पार्शी हॉटेल मालकानं तर आम्हांला भीती घातली होती की, माझं हॉटेल तुम्हाला पसंत पडत नाही, मग उटीचं ' सेसील ' काय पसंत पडणार ?

परंतु सेसीलचं पहिलं दर्शन मोठं रम्य वाटलं. आईच्या कडेवर मूल बिलगलेलं असावं तसं एका टेकडीच्या कुशीत निलगिरी, देवदार वृक्षांच्या छायेत सेसील हॉटेल वसलेलं आहे. हॉटेलची मुख्य इमारत एखाद्या इंग्लिश कॉटेजच्या धर्तीची, आढ्यावर चिमण्यांची धुराडी आणि पुढे छपरावर त्रिकोनी ' गेबल्स ' अशा थाटाची वाटली. मला वाटलं, याच बंगल्यात आमच्या खोलीची व्यवस्था असेल. परंतु उजव्या हाताला चार-पाच पायऱ्या चढून गेल्यावर बागेच्या दुसऱ्या टप्प्यावर दिसणाऱ्या दोन छोटया बंगल्यांपैकी एकाचं दार उघडून ' ही तुमची बंगली ' असं वेटर सांगू लागला. तेव्हा मला आश्चर्याचा गोड धक्काच बसला. किती टुमदार बंगली होती. नक्षीदार गेबल्स, दाराखिडक्यांवर झुलणारे लेसचे शुभ्र पडदे, गुबगुबीत कोच मांडलेला छोटासा लाऊंज, प्रशस्त बेडरूम आणि तिला जोडूनच प्रत्येकासाठी स्वतंत्र असे दोन ड्रेसिंग रूम-बाथरूमचे जोड विभाग. पायांखालच्या गुळगुळीत फळयांच्या फ्लोअरिंगवर अंथरलेले गालिचे. ठिक-

ठिकाणी उंच आणि पसरट ठेंगण्या पुष्पपात्रातून ठेवलेली रंगी-बेरंगी 'फ्लॉक्स'ची अनेक तऱ्हेची फुलं होती, निशीगंधाच्या जातीच्या पांढऱ्या फुलांनी लगडलेले लांब तुरे होते आणि हाताच्या ओंजळीसारख्या आकाराची, पांढऱ्या सॅटीनसारखी, सलग एका विशाल पाकळीची, केसरांच्या ठिकाणी पिवळाधमक सोनेरी दांडा असलेली, सुंदर लिलीची फुलं होती. चारी दालनात फिरून आम्ही परत पुढल्या दाराशी आलो तो बाहेर निसर्गाची सजावट तर त्याहून सुंदर दिसली. निलगिरीची उंच उंच झाडं आभाळात डुलत होती आणि दारासमोरच्या एका गुलाबाच्या झाडावर संत्र्याएवढ्या आकाराचे गुलाबाचे भरीव गेंद लटकले होते. वाळवंटात आढळतात तशी 'फ'च्या आकाराची उंच कॅक्टी जशी या बागेत होती, तशीच अनेक पाकळ्यांच्या कमळांसारखी जाड हिरव्या पाकळ्यांची कॅकटीची फुलं बागेच्या बांधावर ओळीनं लावलेली दिसली.

इतक्यात निरोप आला 'गरम चहा–टोस्ट तयार आहे. स्नानाचं गरम पाणी तयार आहे आणि एक वाजता डायनिंग हॉलमध्ये तुमचं टेबलही तुमची वाट पाहत आहे.'

आमच्या चिमुकल्या बंगलीला कुलूप लावून आम्ही मुख्य बंगल्याच्या डायनिंग हॉलमध्ये गेलो. सात-आठ टेबलं मावतील असा मोठा प्रशस्त हॉल होता. गव्या रेड्याची झुंज, खेडुापार्टी अशी चित्रं भिंतीवर लावलेली होती आणि प्रत्येक टेबलावर फुलांची नुसटी लयलूट दिसत होती. डायनिंग हॉलमध्ये शुक-शुकाटच होता. नाही म्हणायला आमच्या जवळच्या टेबलावर एक इंग्रजी स्त्री बसली होती. तिनं लांडा स्कर्ट घातला होता. म्हणूनच केवळ तिला स्त्री म्हणायचं. बाकी आखूड केस, उग्र

चेहरा आणि पुरुषासारखा घातलेला कोट अशा थाटामुळे ती गर्विष्ठ इंग्रज हेडमास्तरासारखी दिसे. मधून मधून ' उहूं, उहूं ' असं खाकरण्यापलीकडे ती शब्दही बोलत नसे.

शिवाय आणखी एक व्यक्ती दाराशी खड्या पारशाप्रमाणं उभी दिसली. जुन्या पद्धतीचा वेस्टकोटसह चढविलेला गरम सूट, लठ्ठ पोटावर ताणून बसलेल्या जाकिटाच्या खिशातून लोंबकळणारी घड्याळाची सोन्याची साखळी, पाठीमागे बांधलेले हात आणि जमिनीवर रोवलेले घट्ट पाय अशा या जाडजूड शरीरावर गुबगुबीत, गुलाबी, पार्शी धर्तीचा लांबट नाकाचा चेहरा होता. गाल वयानं सुटलेले, डोळे अर्धवट मिटलेले. हा ' खडा पार्शी ' म्हणजे जेवणगृहाच्या सजावटीपैकी एक भाग म्हणजे पुतळा तर नव्हता ? . . .

कुणीच कुणाशी बोलत नव्हतं म्हणून मग आम्हीदेखील एकमेकांशी बोललो नाही. वेटर मांजराच्या पायांनी येऊन गरम गरम ' सूप ' वाढीत होता. मस्कापाव पुढे सारीत होता. पुलावावर चिकनची करी घालीत होता. पुडिंगवर मधाळ रंगाचा गोड सॉस ओतीत होता आणि आम्ही मुक्या चित्रपटातील पात्रांप्रमाणं कधी डोळे मोठे करून, तर कधी मिटक्या मारून एकमेकांना पसंती कळवीत पदार्थांचा समाचार घेत होतो. असं आळीमिळी गुपचिळी आमचं जेवण झालं. परंतु मला सारखी भीती वाटत होती की या तंग वातावरणात सूपचा एक सणसणीत ब्राह्मणी भुरका मारण्याचा मोह आप्पांना होणार––

आम्ही टेबलापासून दूर झालो, तसा तो पुतळाही जागचा हालला. आमच्यापाशी येऊन थंडपणे डाव्या तळहातावरच्या डबीतली तपकीर उजव्या चिमटीनं नाकात घालीत त्यानं आमची

मोजक्या शब्दांत चौकशी केली. आपली ओळख करून देताना तो म्हणाला, " माझं नाव सखीदास. हे माझ्या मालकीचं हॉटेल आहे. ठीक आहे ना व्यवस्था ? "

सर्कशीतला रिंगमास्तर नुसत्या चाबकाच्या इशाऱ्यावर जनावरांकडून निमूटपणे काम करून घेतो. त्याप्रमाणं हा सखीदास नुसता इथे तिथे उभा राहून नोकरांकडून व्यवस्थित काम करून घेत असावा. कमी बोलणाऱ्या माणसांची जरब जास्त वाटते हे खरं ! पण सखीदास मितभाषी होता हा आमचा एक भ्रम होता, असं लवकरच आम्हांला कळणार होतं. 'व्यवस्था एक्सलंट' असं सखीदासना उत्तर देऊन आम्ही जेवणाच्या हॉल-बाहेर पडलो.

इतक्या सुंदर जेवणानंतर डोळ्यांवर झोपेची गुंगी चढावी हे साहजिकच होतं. परंतु उटकमंडचं सारं सौंदर्य वाट पाहत असताना झोपा काढण्याइतका अरसिकपणा आमच्या अंगी खासच नव्हता. परंतु पाहतो तो मोटारीसह नारायण ड्रायव्हर कुठं नाहीसा झाला होता. बहुतेक स्वारी सांबारभाताच्या शोधार्थ गेली असावी. तेव्हा आता सक्तीची विश्रांती घेणंच भाग होतं. भर दुपारच्या प्रहरीदेखील हवेत किती थंडाई होती ! गरम गरम रग अंगाभोवती लपेटून पुढच्या कार्यक्रमाचे बेत ठरविण्यात तरी काय कमी मौज होती ! आता नारायण परतल्यावर प्रथम कुठं जावं ? उटी लेकवर जाऊन बोटिंग करावं ? दोडाबेट्टा पीक-वर जाऊन उटीचं विहंगमावलोकन करावं ? गव्हर्न्मेन्ट गार्डन-मध्ये जाऊन सहल करायची ? उटीच्या बाजारपेठेत फेरफटका मारायचा ? की तोडा जमातीच्या तोडा घरांना भेट द्यायची ? या उटकमंडच्या छोट्या मुक्कामात रात्र थोडी अन् सोंगं फार

असा प्रकार होणार. . .हा नारायण येणार तरी केव्हा ? अशा विचारात मला केव्हाच झोप लागली.

मोटारीचा हॉर्न ऐकताच जागी होऊन घड्याळाकडे पाहते तो वाजले होते पाच ! आता नारायणवर रागावण्यात काय अर्थ होता ? आम्ही घाईघाईनं हॉटेलबाहेर पडलो आणि मोटार उटीच्या फॉरेस्ट रेंजरच्या बंगल्याकडे न्यायला सांगितली. मृदुमलाईच्या हत्तीच्या रिझर्वेशनबद्दल व्यवस्था झाली असल्याची खात्री करून घेणं भाग होतं. ' ही भलतीच कटकट ' अशी कुरकुर मी करताच ' हत्ती गेला, शेपूट राहिलंय ! ' असं बोलूनच आप्पा हसले.

ती खरं म्हणजे ऑफीस सुटायची वेळ होती. तरीदेखील तेथील हेडक्लार्क आणि क्लार्कनी आमचं काम मोठ्या तत्परतेनं करून दिलं. मृदुमलाईच्या अभयारण्य बंगल्यात पुष्कळ प्रवासी मंडळी येऊन राहतात. हत्तींनाही मागणी भरपूर असते. त्यामुळं बंगल्यातील खोली आणि हत्ती या दोहोंचे रिझर्वेशन उटी येथील फॉरेस्ट कचेरीकडून करून घेणं आवश्यकच होतं. शेवटी हत्तीच्या आणि बंगल्याच्या रिझर्वेशनचे कागद खिशात घेऊन कारकुनांचे आभार मानून आम्ही बाहेर पडलो, तेव्हा साडेपाच वाजून गेले होते.

आम्ही मग सरळ उटी लेकवर गेलो. आम्ही बोट हाऊसवर गेलो तेव्हा तळ्यावर शुकशुकाट होता आणि नावाडी पत्ते खेळीत बसले होते. आम्ही तिकिटं काढली आणि धक्क्यावर येऊन उभे राहिलो. धक्कादेखील मोठा नाविन्यपूर्ण वाटला. बोट हाऊसपुढची उतरती जागा मऊ, लुसलुशीत हिरवळीनं भरली होती आणि किनाऱ्यानं आपली चार बोटं पाण्यात खुपसल्याप्रमाणं

हिरवळीचे पट्टे तळ्यात शिरले होते. दोन पट्ट्यांमधल्या पाण्यात नावा नांगरून ठेवलेल्या होत्या. आमच्या नावेला एंजिन लावताच जमिनीच्या पट्ट्यावरून आम्ही सहज बोटीत जाऊन बसलो. इंजिनाचा छकछक आवाज चालू झाला आणि उटीलेकच्या आरशासारख्या संथ पृष्ठभागावर केसाळ रेघ ओढीत आमची नाव खोल पाण्यातून मार्ग कापू लागली. मी कवि असते तर माझ्याभोवती पसरलेल्या सौंदर्यावर कविता रचली असती. चित्रकार असते तर आभाळाचा तो पाऱ्यासारखा निळा रंग, तळ्याचा मोरपंखी रंग, झाडांच्या हिरव्या छटा, फुलांचे संमिश्र रंग अशा रंगात कुंचला बुडवून एक सौंदर्यचित्र फलकावर रंगविलं असतं आणि आता ती जादू मी शब्दात पकडू पाहते आहे. परंतु लेखकाचे शब्द आणि चित्रकाराचा कुंचला दुबळा ठरावा असंच ते दिव्य सौंदर्य होतं. माणसाला निःशब्द करणारं, उंच उंच नेणारं. . .दिव्यत्वाचा साक्षात्कार घडविणारं.

लांबून पाहिल्यावर उटी लेक विस्तारान महाबळेश्वरच्या वेण्णालेकएवढं असावं असा भास होतो. परंतु आता बोट मध्यभागी गेल्यावर उटीच्या सरोवराची भव्यता जाणवू लागली होती. वेण्णापेक्षा दुपटीनं मोठ्या असलेल्या या सरोवराच्या किनाऱ्यावर कर्दळीसारख्या बुटक्या झाडांची थापच्या थाप लागलेली दिसली. कर्दळीला फुलांचे तुरे येतात, तसे या झाडांनाही फुलांचे तुरे आलेले दिसले. मात्र या फुलांचे देठ कमळाच्या देठासारखे जाड आणि लांब होते. हातांची ओंजळ करावी तसाच या फुलांच्या साटणीसारख्या शुभ्र, सलग पाकळीचा आकार होता आणि मधल्या केसराच्या सोनेरी दांड्यानं पाकळीची शुभ्रता वाढली होती. हॉटेलमधल्या मोठ्या काचपात्रात आम्ही ही फुलं

पाहिली तेव्हा त्यांच्या सौंदर्यामुळं ती दुर्मीळ असावीत, असं आम्हांला वाटलं होतं. पण आता पाहिलं तो उटी सरोवराचा सारा किनारा या पांढऱ्या रानकमळांनी फुलला होता. आरशावर ठेवलेल्या रत्नहाराचं प्रतिबिंब आरशात दिसावं त्याप्रमाणं फुलांनी मढविलेल्या किनाऱ्याच्या पट्टीचं प्रतिबिंब पाण्यात उमटल्यामुळं पाण्याच्या निळ्या शालूला डबल किनार लावल्याचा भास ठिकठिकाणी होत होता.

काही ठिकाणी रानझुडपांची गर्दी बाजूला सारून पाण्यात गळ टाकून काही माणसं पुतळ्यासारखी निश्चल बसलेली दिसत होती. 'एनी लक ?' असं आप्पांनी ओरडून विचारलं की ती समाधी भंगून भानावर येत आणि नकारार्थी हात किंवा मान हलवीत. एकानंच फक्त एक लहानसा मासा टोपलीतून उचलून मोठ्या विजयानं हालविला. मी आप्पांना म्हटलं, "मासा आंधळा असला पाहिजे. गळ टाकणारा किनाऱ्यावरचा सुलटा माणूस पाण्यात स्वच्छ उलटा दिसत असताना कोणता डोळस मासा गळाला तोंड लावील ?" . . . इतक्यात सूर्य क्षितिजाच्या विंगआड गेला. त्यानं कोणती कळ दाबली कुणाला ठाऊक, पण सरोवराच्या सेटिंगवर पश्चिमेच्या बाजूनं गुलाबी प्रकाशाचा तिरपा झोत पडला आणि एकदोन स्विच बंद केल्याप्रमाणं निलगिरी वृक्षाच्या बुंध्यापुंध्यातला प्रकाश एकदम क्षीण झाला. पाण्याचा विशाल आरसा कलंडल्यासारखा झाला. एकीकडचं पाणी दाट किरमिजी दिसू लागलं आणि दुसऱ्या बाजूवर सोनेरी तवंग चमकू लागला. ग्लासातल्या पेयात बर्फाचे खडे टाकल्याप्रमाणं हवा एकदम इतकी थंड झाली की, अंगावर रोमांच उभे राहिले. क्षणोक्षणी बदलणाऱ्या या सरोवराच्या शोभेकडे किती

पाहिलं तरी थोडंच होतं. अखेर अंधाराचा झिरझिरीत पडदा सरकू लागला तशी आमची छोटी नाव किनाऱ्याच्या बोटाला धरून उभी राहिली आणि आम्ही आमचे पाय जमिनीवर टेकले.

लेकवरच्या काव्यमय वातावरणातून पाच-दहा मिनिटांच्या आत आम्ही चेरिंग क्रॉसवर आलो. उटकमंड शहराला आळ-वाच्या पानाची उपमा दिली तर चेरिंग क्रॉसला जेथे पानाच्या शिरा एकत्र येऊन मिळतात त्या मध्यबिंदूची उपमा द्यावी लागेल. चेरिंग क्रॉस म्हणजे एक लहानशी वर्तुळाकार बाग आहे. या बागेभोवतीच्या आवारातून अनेक रस्ते फुटले आहेत. एक रेसकोर्सकडे जातो, दुसरा तलावाकडे जातो, तिसरा रेल्वे स्टेशनकडे तर चवथा बाजारपेठेकडे. उटकमंड खोऱ्याच्या अगदी सखल विभागात चेरिंग क्रॉस, लेक बाजारपेठ, रेसकोर्स ही स्थळं आहेत. चेरिंग क्रॉसला वळसा घालून बाजारात एक फेरी मारून आम्ही सरळ रेल्वे स्टेशनवर गेलो. संध्याकाळच्या वेळीदेखील चेरिंग क्रॉसवर किंवा बाजारपेठेत माणसांची फारशी गर्दी नव्हती. याचं मुख्य कारण असं की नोव्हेंबर–डिसेंबर हा काही उटकमंडचा सीझन नव्हे. या महिन्यात उटकमंडची हवा कमालीची थंड असते. सेसील हॉटेलच्या दारापुढे लावलेल्या मोठ्या थर्मामीटरमध्ये हवेचं कमाल उष्णतामान पन्नास डिग्री असे. रस्ते, दुकान निर्मनुष्य होती. याचं कारण अंगात हुडहुडी भरविणारी ही थंडी हेच असावं.

बाजारपेठेच्या मानानं उटीचं रेल्वे स्टेशन उंचवठ्यावर आहे. स्टेशनची छोटी इमारत आणि छोट्या प्लॅटफॉर्मच्या बाजूला उभी असलेली छोटी आगगाडी पाहून माथेरानच्या आगगाडीची आठवण झाली. मद्रास ते कोइमतूर, कुन्नूर, मेट्टुपलायम, उटकमंड

असा हा रेल्वेचा एकच मार्ग आहे. या चिंचोळ्या मार्गानं जाणाऱ्यायेणाऱ्या आगगाडीच्या मध्यभागी काटेरी चाकं असतात असं मी ऐकलं होतं आणि चिमटीनं इंजिन उचलून ती चाकं पाहण्याचा मोह होत होता. परंतु ही पोरकट जिज्ञासा दाबून आम्ही प्लॅटफॉर्मवर फेऱ्या मारू लागलो. एका पाटीनं आमचं लक्ष वेधून घेतलं. तीवर अक्षरं होती—'उतक मंडलम्.' 'निळे डोंगर आणि तांबडी माती' या आपल्या प्रवास वर्णनाच्या पुस्तकात उटकमंड या नावाची व्युत्पत्ति 'उदकमंडलम्' अशी अनंत काणेकरांनी लावली ती याच 'उतक मंडलम्' या नावाच्या पाटीवरून असावी.

परंतु पुढं लवकरच मला कळलं की उटकमंड या नावाचा काणेकरांच्या 'उदका' शी काहीच संबंध नाही. या नावाच्या व्युत्पत्तीची हकीकत फार मजेदार आणि वेगळीच आहे.

स्टेशनबाहेर पडून आम्ही रस्त्यावर आलो. या ठिकाणी टॅक्सी स्टँड असल्यामुळं नेहमी मोटारी उभ्या असतात आणि भाडोत्री मार्गदर्शकही.

दुसऱ्या दिवशी पहाटे उठून 'दोडाबेट्टा' शिखरावर जाण्याचा कार्यक्रम आम्ही ठरविला होता आणि त्यासाठी एक मार्गदर्शक रिझर्व करण्याच्या विचारात आम्ही होतो. प्रवाशांचं दुर्भिक्ष्य असल्यामुळं पुष्कळसे मार्गदर्शक रिकामटेकडेच उभे होते. आम्हांला पाहताच त्यांनी आमच्यावर चौफेर हल्ला चढविला. त्या हल्ल्यातून कशीबशी सुटका करून घेऊन आम्ही हॉटेलच्या दिशेनं मोटार सोडली. टेकडीभोवती वळसे घेत घेत मोटार सेसीलचा चढ चढू लागली. वर गेल्यावर मी ड्रायव्हरला एकदम म्हटलं, "गाडी थांबव." नारायणनं गाडी थांबविली. डाव्या

बाजूच्या खिडकीतून आम्ही पाहू लागलो तो किती सुंदर, किती भव्य देखावा पसरला होता. उटकमंडची सारी वस्ती टेकडयांच्या उतारावर आहे. टप्प्या-टप्प्यावर घरांच्या रांगा दिसतात, पण आता रात्रीच्या पहिल्या प्रहरी उटीच्या खोऱ्यात काळोख दाटला होता आणि जिकडे पाहावं तिकडे दिव्यांच्या मालिका चमचम करीत होत्या. टेकडयांचा नव्हे, तर जणू कुर्गी बायकांचा घोळका अंधारात बसला होता. आणि त्यांच्या वक्षस्थळावरचे हिऱ्या-माणकांचे हार लखलखत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी आठ हजार सहाशे पन्नास फूट उंचीच्या दोडाबेट्टावरून उटीची शोभा अगदी वेगळी दिसली. रात्रीचा तो काळा समुद्र तर आता सकाळच्या प्रहरी दोडाबेट्टाच्या चारी दिशांना धुक्याचा पांढरा समुद्र जणू उसळत होता. तरी ब्रेकफास्ट उरकून साडेआठच्या सुमाराला आम्ही दोडाबेट्टाच्या रस्त्याला लागलो होतो. रेल्वे स्टेशनपाशी एक मार्गदर्शक ठरवून बरोबर घेतला होता. चेरिंग क्रॉसला वळसा घालून विलेबाँड रोडवरून दोडाबेट्टा पीकवर पोचायला फार तर वीस मिनिटं लागली असतील. दोडाबेट्टाचा पाच-सहा मैलांचा घाट मात्र अगदी उभ्या शिडीसारखा खडा वाटला. प्रत्यक्ष दोडाबेट्टा पॉइंटवर उभं राहून खाली पाहिल्यावर क्षणभर भास झाला, आपण विमानाच्या खिडकीतून तर खालच्या पृथ्वीकडे पाहत नाही ? दोडाबेट्टा पॉइंट भोवती वर्तुळाकार बांध आहे. मध्यभागी एक टेहळणीसाठी बंगली आहे. बंगलीचा रखवालदार आम्हांला पाहून पुढे झाला आणि दूरवर हातांनी खुणा करून सांगू लागला "ही पाहा क्लबहिल. क्लबहिलच्या फाटयाचं शेवटचं टोक 'स्नोडन'. स्नोडन आठ हजार फूट उंच आहे. स्नोडनच्या खाली

मोठं खोरं दिसतं आहे, त्या ठिकाणी वेलिंग्टन बरॅकस् आहे. तिथेच कोईमतूर दिसत आहे. त्याच्या पुढे जरा कोटागिरी. ही समोर दिसते ती टायगर हिल. टायगर हिल पलीकडे पर्वतांची रांग दिसते ना, तिचं नाव कुंढा ब्रिज."

कुंढा पर्वतांची रांग कमानीच्या पुलासारखी दिसत होती खरी!

"हे खाली म्हैसूरचं पठार–" रखवालदार सांगत होता आणि कित्येक मैल विस्ताराच्या दऱ्याखोऱ्यांनी आणि टेकड्यांनी भरलेल्या प्रदेशाची ती भव्य शोभा आमच्या डोळ्यांत आम्ही साठवून घेत होतो. सकाळी शहाळ्यातल्या मलईसारखं वाटणारं कोवळं ऊन आता जून खोबऱ्याच्या तुकड्यासारखं शुभ्र झालं होतं. धुक्याचं विरल वस्त्र वाऱ्यानं केव्हाच उडवून लावलं होतं. परंतु लाजऱ्या स्त्रीनं तोंडावरचा घुंगट ओढून धरावा तसं कोईमतूरच्या खोऱ्यानं आपल्या चेहऱ्यावर धुक्याचा घुंगट ओढला होता. पिसासारखे हलकेफुलके ढग तरंगत होते. निसर्गाचं ते अथांग रूप मनात साठविण्याचा प्रयत्न म्हणजे आकाशाला गवसणी घालू जाण्याइतकाच अपुरा !

दोडाबेट्टा पॉईंटच्या मध्यभागी एक छोटा स्तंभ आहे आणि त्यावर दोन कविता कोरलेल्या आहेत. त्यांपैकी एक टागोरांची आहे–" अंगावर घाव घालणाऱ्या कुऱ्हाडीच्या पात्याला आपला सुगंध लावणाऱ्या चंदनाचं झाड काय शिकवतं ? शत्रूलादेखील प्रेमानं जिंका ! " दुसरी कविता जॉइस किल्मरची आहे–

जॉइस म्हणते, " झाडाइतकं मूर्तिमंत काव्य मी दुसरं पाहिलं नाही. कविता काय, माझ्यासारखी मूर्ख माणसं जुळवतात, पण हे पानाफुलांचं दिव्य काव्य प्रत्यक्ष परमेश्वरच रचू जाणे ! "

नंतर खाली परतल्यावर आम्ही गव्हर्न्मेन्ट गार्डनमध्ये गेलो.

तेव्हा तिथल्या सुंदर वृक्षाकडे पाहून जॉइसच्या या काव्यपंक्तींची आठवण मला वरचेवर होत होती. महाराष्ट्रातल्या वडपिंपळाच्या मानानं हे वृक्ष विस्तारानं आणि जाडी-उंचीनं किती भव्य दिसत होते. काहींची पानं बारीक तर काहींची चवरीसारखी. आकारही काहींचे झुंबरासारखे तर काहींचे दीपमाळेसारखे. या वृक्षांवर नावाच्या पाटचा होत्या, त्या नावाचे उच्चार आणि स्पेलिंग 'वेबस्टर' जाणे ! हे वृक्ष ऑस्ट्रेलिया किंवा कॅलिफोर्नियातून आणून लावलेले होते. गव्हर्न्मेंन्ट गार्डनमधले हिरवळीचे हिरवेगार गालिचे आणि फुलांचं काचघर फार पाहण्यासारखं आहे. पायातली चप्पल काढून या हिरवळीवर बागडण्याचा मोह आवरणं कठीण होतं. त्याचप्रमाणं काचघरातली ती सहस्रवधी रंगीबेरंगी फुलं पाहून आपण फुलपाखरूं व्हावं आणि या फुलांच्या झुबक्यात लोळावं असा मोह होतो. उटकमंडची आठवण म्हणून या बागेतून काही कॅकटस् आणि फुलांचे गड्डे घेण्याची माझी इच्छा होती, पण 'तोडामंड' पाहण्याचा एक कार्यक्रम शिल्लक होता, म्हणून आम्ही घाईनं बागेबाहेर पडलो.

'मंड' या शब्दाचा गाव असा अर्थ आहे. उटकमंड हे मूळचं तोडा लोकांचं मंड. सुलिवॉन नावाच्या कोईमतूरच्या कलेक्टरनं अठराशे बावीस साली या तोडामंडमध्ये एक दगडी बंगला बांधला. 'स्टोन हाऊस' या नावानं अजूनही तो बंगला ओळखला जातो. उटकमंडचे आदिवासी तोडा आपल्या वस्तीला म्हणू लागले, 'वत्तकलमंड' म्हणजे एका दगडी घराचं गाव.' वत्तकलमंडमधल्या 'ल' चा लोप झाला आणि उरलं 'वत्तकमंड'. हेच आजचं उटकमंड ! 'उटकमंडची' खरी कुळकथा अशी आहे. प्रोफेसर काणेकरांचा 'उदकमंडलु' म्हणजे केवळ कविभ्रम आहे!

उटकमंडमध्ये गोऱ्यांचा शिरकाव झाला. रस्ते, बगीचे, वस्ती वाढू लागली आणि आपोआपच तोडांची हकालपट्टी झाली. आता तोडा लोक बाजारात येतात ते दूध-लोणी विकण्याकरिता. एरवी यांची घरं गावापासून दूर रानात आढळतात.

"नीलगिरीची राणी—उटी !"

असं एक तोडाचं घर पाहायला आम्ही गेलो. या वेळी बारा वाजले होते. एका पाऊलवाटेनं खाचखळगे तुडवीत आम्ही टेकडी चढून गेलो. तो तोडांची दोन घरं आढळली. पीक उभं कापून जमिनीवर ठेवल्यावर जसं दिसतं तशी ही घरं होती. पुण्याच्या निसेन हटच्या चिचोळ्या आवृत्त्या म्हणायला हरकत नाही. आम्ही अंगणात शिरताच पोरं कडेवर घेऊन बायका गोळा झाल्या. शरीरानं सुदृढ, निमगोऱ्या, काखेखालून आडवा पदर घेतल्यामुळं खांदे, गळा उघडा ठेवणाऱ्या. आम्ही त्यांच्याकडे टक लावून पाहत होतो तरी त्या लाजल्या नाहीत. उलट नि:संकोचपणे हंसू लागल्या. साऱ्याजणींचे केस काळेभोर. कानांपर्यंत सरळ विचरलेले, पण पुढे बटा घेऊन प्रत्येक बट पीळ भरून मानेवर सोडून दिलेली दिसली. एका बाईच्या केसाच्या लडी मी हातात घेतल्या. तो त्यांचा स्पर्श किती थंड. किती मऊ, मुलायम वाटला. मी आप्पांना म्हटलं, "पाहा तरी. . ." आम्ही त्या बायकांना गाणं म्हणायला आग्रह केला. मग त्यांनी एकदोन मैत्रिणी बोलावल्या. साऱ्याजणी घोळका करून बसल्या. उजव्या काखोटीत पोरं कवळून डावा हात कानशिलावर ठेवून, खुला आवाज काढून त्या आलाप घेऊ लागल्या.

काही वेळ त्यांची आलापी ऐकून आप्पा मला म्हणाले, "ऐक. सारंग रागाची धून किती स्पष्ट दिसते यांच्या गाण्यात."

मग सरगम करून आप्पाही गुणगुणू लागले, " मरेपम निप मरे सासा रे—"

हळूहळू त्या गीताचे स्वर उंच, गंभीर होत गेले आणि उटकमंडच्या इतिहासातली एक स्मृती जिवंत होऊन उभी राहिली. ती दरिद्री पोरें, ते ओसाड आंगण, मरतुकडी कुत्री—सारं काही नाहीसं झालं. पैकारा नदीच्या तीरावरचं घनदाट अरण्य उभं राहिलं. एकमेकांच्या खांद्याभोवती ज्यांचे हात गुंतलेले आहेत, ज्यांची पावलं तालावर मागंपुढं पडत आहेत, ज्यांच्या उभट निबर चेहऱ्यावर धुंदी चढली आहे, अशा आदिवासी तोडा स्त्री-पुरुषांचं नृत्य साकार झालं.

इतक्यात गाणं थांबलं आणि माझं स्वप्नही भंगलं. मनात आलं, त्या पराक्रमी ऐतिहासिक कालातली तोडांची मस्ती गेली, चैन गेली खरी ! आता उरली फक्त लाचारी आणि हमाली ! तोडा बायकांनी हात पुढं करताच त्यावर पैसे टाकण्याची मला शरम वाटली. बिचारे तोडा !

जाण्यापूर्वी तोडांचं घर पाहण्याची इच्छा होती, पण कोनाडच्या-एवढ्या दारातून आम्ही आत प्रवेश करणंच मुष्किल होतं. शेवटी गुडघ्यावर वाकून डोकं जवळजवळ जमिनीला लावून आम्ही त्यांच्या घरात निरखून पाहिलं. आत चूल मांडलेली होती. चुलीतलं जळण पुढं सारीत एक बाई बसलेली दिसली. जवळ एक मूल बसलेलं दिसलं. आणि मागं भिंतीच्या फळीवर ओळीनं पितळेचे चकचकीत ग्लास पालथे घातलेले दिसले. चौथऱ्यावर काही कपडे दिसले. तोडांच्या घरातली ती आधुनिक वस्त्रभांडी पाहून एक गमतीदार कल्पना मनात डोकावली की हे उभं पीक कापल्यासारखं, कोनाडच्याएवढ्या दाराचं घर, उघडे खांदे

ठेवून गुंडाळलेली वस्त्रं, पेळूंची केशरचना आणि सारंग रागातली आलापी हा पाहुण्यांना दाखविण्यासाठी केला जाणारा सांस्कृतिक कार्यक्रम तर नसेल !

तोडांची घरं पाहून आम्ही सेसील हॉटेलवर परतलो. तेव्हा एक वाजून गेला होता. लंचला आम्ही उशिरा गेलो, पण सखीदास आमची वाट पाहतच होते. आदल्या रात्री त्यांची व आप्पांची खूप जानपहेचान झाली होती. आपल्या ऐंशी वर्षांच्या दीर्घायुष्याची हकीकत त्यांनी ऐकवली होती. टिळकांच्या व्याख्यानांना आणि खटल्यांना आपण न चुकता कसे जात असू, महाराष्ट्रीय माणसांबद्दल आपल्याला किती प्रेम वाटतं, इथपासून तो पाय फुटण्यापूर्वीच दौडण्याची चूक करणाऱ्या काँग्रेसपर्यंत आपली उलटसुलट मतं त्यांनी ऐकविली होती आणि त्यांचं बोलणं मनःपूर्वक ऐकत असल्याचं नाटक आप्पांनी इतकं बेमालूम वठविलं होतं की सखीदास आजही पुन्हा जेवणघरात रेंगाळत होते.

जेवता जेवता आम्ही सखीदासांना म्हटलं, "आम्ही उद्या सकाळी ब्रेकफास्टनंतर मृदुमलाईला जाणार आहो. आमचं बिल तयार ठेवा––"

धक्का बसल्याचा अभिनय करून ते म्हणाले, "वा ! मी समजत होतो, तुम्ही बारा तारखेपर्यंत राहणार ! "

आमचा मृदुमलाईचा एलिफंट राईडचा बेत ऐकून त्यांना आणखीच धक्का बसला. ते म्हणाले, "शहाणे असाल तर तो कार्यक्रम रद्द करा." मग त्यांनी आपला अनुभव सांगितला. नंतर आठ दिवस आपण अंथरूण कसं धरलं होतं, याचं वर्णन केलं. परंतु आमच्या निश्चयापासून आम्ही तीळमात्र ढळलो नाहीच.

ती संध्याकाळ आम्ही उटीच्या रस्त्यातून फेरफटका मारण्यात घालविली. फोटोग्राफरच्या दुकानात काही वेळ घालविला. उटीचा हा आमचा शेवटला दिवस होता. परंतु या दोन दिवसांच्या मुक्कामात आम्ही खूपच पाहिलं होतं. अर्थात ज्यांना पायी खूप हिंडण्याची हौस आणि शक्यता आहे, घोड्यावर रपेटी करण्याचा, रानावनात भटकण्याचा छंद आहे, अशा स्त्री-पुरुषांना उटीच्या परिसरात घालवावे तितके दिवस थोडे वाटतील. मार्लिमंड लेक, क्लबहिल, स्नोडन शिखर, दोडाबेट्टा, एल्क हिल, केर्न हिल, तोडा देऊळ, सिगूर घाट, आरंबी अरण्य, टायगर हिल, पैकारा डॅम वगैरे आठ-दहा मैलांच्या परिघातली ही रम्य स्थळं पायी सहल करणाऱ्यांना फारच आवडतील. उटीचे चहाकॉफीचे मळे, हिरवळीनं भरलेल्या टेकड्या, दाट अरण्यातून टेकडीवर चढणाऱ्या पाऊलवाटा आणि पायी चढणाऱ्याच्या कपाळावरचे घर्मबिंदू पुसून टाकणाऱ्या हवेच्या थंड झुळका, दऱ्याखोऱ्यांत डोकावणारं निळं आकाश, त्यावर तरंगणारी ढगांची शुभ्र पिसं, संध्याकाळची हवा आपल्या कर्पूराच्या गंधानं दरवळून सोडणारे ते युकॅलिप्टसचे वृक्ष—हे सारं वातावरण पायी सहल करणारांना किती स्वर्गतुल्य वाटेल हे काय मी सांगायला हवं ?

ठरल्याप्रमाणं दहा तारखेला रविवारी सकाळी ब्रेकफास्ट उरकल्यावर आम्ही उटकमंडचा निरोप घेतला. पुनः पुन्हा मागे वळून पाहत, जड मनानं आम्ही त्या अत्यंत सुंदर, रम्य वनश्रीला शेवटचा प्रणाम करून निघालो. अडतीस मैल घाट उतरल्यावर अभयारण्यातील डाक बंगल्यात आमची मोटार शिरली. बंगल्याच्या आवारातून एक छोटा मोर टपटप पावलं टाकीत, आपलं तुरेवालं डोकं ठेक्यात हलवीत आमच्यापाशी आला. चौकसपणे

मान हलवीत अगदी स्पष्ट म्हणाला, " काय काय सामान आहे मोटारीत ? माझ्यासाठी खाऊ आणलाय तुम्ही ! "

मी त्याला मिठाई काढून दिली. ती त्यानं टोचून फेकून दिली. पण द्राक्षं आणि केळी मात्र मटकावून टाकली. त्या क्षणापासून त्याची आणि आमची खूपच दोस्ती जमली. स्नान, जेवण आटोपून आम्ही दुपारी साडेतीन वाजता दोन मैलांवरच्या कार-गुडी कचेरीत गेलो. खिशातले रिझर्वेशनचे कागद तेथील ऑफि-सरला दाखवले. हत्तीवरच्या रपेटीला माणशी दहा रुपये भरावे लागतात. शिवाय जंगल प्रवेश फी एक रुपया. म्हणजे एकूण बावीस रुपये भरून आम्ही रस्त्यावर येऊन बसची पाहावी तशी आमच्या हत्तीची वाट पाहू लागलो. या रस्त्याचा एक फाटा सिगूर घाटाकडे गेला आहे. या तिठ्यावरच ' मायार ' नदीचा पूल आहे. मला हा पूल फार आवडला. प्रमाणापेक्षा भलल्याच उंच कमानी असलेल्या या पुलावरून दोन्ही तीरांवरच्या वृक्षांच्या फांद्यांनी झाकलेल्या मायारच्या संथ प्रवाहाकडे पाहिलं की क्वाय नदीवरच्या त्या पुलाची आठवण होते ! या सिगूर रस्त्यानंच आमचा हत्ती येणार होता.

अखेर डुलत डुलत हत्ती आला !

मी पहिला प्रश्न आप्पांना विचारला, " हत्ती आला खरा, पण अंबारी कुठं आहे ? "

आप्पा मिस्किलपणे हसू लागले. तेव्हा मी खुलासा केला, " सोन्याची अंबारी नसेना, पण निदान पाळण्यासारखा हौदा तर हवा. "

एखाद्या अवजड यंत्रासारख्या निर्विकार हालचाली करीत हत्ती खाली बसला. त्याच्याबरोबर आलेल्या दोघा माणसांनी

हत्तीला शिडी लावली. आता माघार घेणं शक्य नव्हतं, म्हणूनच केवळ मी शिडी चढू लागले. मनात एकच शंका होती. या हत्तीवरून घसरणं शक्य आहे, बसणं अशक्य, कारण हत्तीच्या पाठीवर फक्त एक काथ्याची गादी टाकलेली होती. रिकिबीसारखा पायाला आधार म्हणून दोन्ही बाजूंना दोन आडव्या फळ्या साखळदंडानं जाम बांधल्या होत्या आणि हाताला आधार म्हणून माहुताकडच्या बाजूला आणि शेपटीकडच्या बाजूला दोन वर्तुळाकृती लोखंडी सळ्या फळ्यांना जोडलेल्या होत्या. माहुताच्या मागे, दोन्ही हातांनी सळीला धरून आप्पा बसले. आता शेपटीकडे तोंड करून बसणं मला अधिक सोयीचं होतं, पण मनाला रुचत नव्हतं. म्हणून मग कोचावर बसावं तसं दोन्ही पाय फळीवर टेकून उजव्या हातानं शेपटीकडची सळई घट्ट पकडून मी हत्तीवर आसनस्थ झाले.

"रेडी ?" कुणीसा प्रश्न केला आणि आमच्या उत्तराची वाट न पाहताच हत्तीनं फक्त पुढचे दोन पाय खांबासारखे सरळ केले. "बापरे !" मी ओरडले. माहुताकडची सळी मी घट्ट पकडली होती म्हणून बचावले. नाही तर सरळ घसरगुंडी ! तशा टांगलेल्या अवस्थेत मी हत्तीला म्हटलं, "आता लवकर उचल बाबा मागचे पाय." हत्ती चारी पायांवर उभा राहिला, तेव्हा कुठं आमची टांगलेली शरीरं पुन्हा स्थानापन्न झाली !

हत्तीच्या पावलांचा आवाज येत नाही म्हणून त्याची गती सफाईदार असेल अशी माझी कल्पना होती. परंतु आता प्रत्यक्ष अनुभवात हत्तीच्या प्रत्येक पावलाबरोबर आडवे हिसके बसत होते. जंगलातल्या पाऊलवाटेनं आमची ही 'गजयात्रा' चालू होती. हळूहळू जंगल दाट झालं. टीक वृक्षांच्या उंच उंच

बुंध्यातून रानवेलींची, केकताडीची जाळी माजलेली दिसली. आता कोणत्या क्षणी एखादा गव्या रेड्यांचा कळप, हरणांचा जथा किंवा वाघरू प्रकट होईल, याचा नेम नव्हता. आजूबाजूला कुठे तरी खसफस आवाज झाला की माहूत खुशाल पाऊलवाट सोडून आवाजाच्या दिशेनं हत्ती जंगलात घुसवी. एखादं काळ्या तोंडाचं लंगूर झाडाला लटकलेलं दिसे. अशा तीन-चार मैलांच्या यात्रेनंतर हत्ती नदीच्या तीराला उभा राहिला. दोन्ही तीरांना पुरुष-दीड पुरुष उंचीच्या दरडी होत्या. पात्रात पाणी फारसं नव्हतं. परंतु मोठमोठे फत्तर आणि आडव्या शिळा पसरल्या होत्या. पलीकडच्या तीराला बांबूचं घनदाट जंगल दिसलं.

माहुतानं आपली दोन्ही पावलं हत्तीच्या कानांच्या पाळीवर जोरजोरात घासली आणि तो ओरडू लागला, " मट मट मट–"

ती दरड उतरण्यासाठी हत्ती उतारावर एकेक पाऊल टाकू लागला. मग मात्र आम्हाला धीर निघेना. माहुताला आमची भाषा कळण्यासारखी नव्हती. म्हणून आम्ही नुसता आरडा-ओरडा केला. हत्ती मागे वळविण्याचा आमचा आग्रह माहुताला पटेना. त्याचं म्हणणं ही नदी ओलांडून बांबूच्या जंगलात गेलो तर गवे रेडे, वाघ, हरणं पाहायला मिळतील. पण ती नदी ओलांडण्याची कल्पना आम्हाला भयप्रद वाटत होती.

शेवटी आल्या वाटेनं आम्ही कारगुडी हत्तीस्टँडवर परतलो. मुदुमलाई जंगलात पाहिलं काय, तर लंगूर वानरांचं कुटुंब आणि एक पाठमोरं हरीण !

त्या दिवशी संध्याकाळी आम्ही तिघं–मी, आप्पा आणि आमचा मोर अभयारण्य बंगल्यापुढच्या हिरवळीवर गुलमोह-

राच्या झाडाखाली बसलो. तेव्हा दुपारच्या एलिफंट राईडच्या अनेक आठवणी काढून मनमुराद हसलो. मोर आपली पिसं साफसूफ करण्यात रमला होता. अंधार पडू लागला. आजूबाजूच्या बांबूंच्या अरण्यात दारांची गूढ उघडझाप होताना व्हावा तसा कर्रकर्र आवाज ऐकू येऊ लागला. समोरच्या उंच झिगारा पर्वत-शिखरावर पॉवर हाऊसच्या दिव्यांचे ठिपके उमटले. तो कातर-गूढ संधिकाल, अरण्यातल्या हलत्या काळ्या सावल्या, बांबूंचा कर्रकर्र आवाज या साऱ्या गोष्टींमुळे कसली तरी बाधा झाल्या-सारखं काही क्षण विचित्र मूक अवस्थेत गेले.

दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्ट आटोपून आम्ही अभयारण्य डाक बंगला सोडला. निघण्यापूर्वी मोराचा निरोप घ्यायचा होता. पाहिलं तो देवदाराच्या उंच शेंड्यावर स्वारी बसलेली आढळली. किती बोलावलं तरी तो खाली येईना. शेवटी त्याचं जग वेगळं, आमचं वेगळं हेच खरं! पण मोटारीत चढताना मी आप्पांना म्हटलं, "या पाखरात जीव अडकला!"

आमच्या कार्यक्रमातला आता बाकी राहिलेला भाग म्हणजे शिवसमुद्रमचा धबधबा आणि पॉवर पाऊस पाहण्याचा. अभया-रण्यमहून सरळ शिवसमुद्रमला जावं, काय पाहायचं ते पाहावं आणि तेथूनच थेट बंगलोरला येऊन बंगलोर मेल गाठावी, असा सल्ला बेटय्यांनी दिला होता, पण तसं करायचं म्हणजे एका दिव-सात सव्वादोनशे मैलांचा ड्राइव्ह करावा लागणार होता अन् शिवसमुद्रम् पाहताना घाई होणार होती. म्हणून आम्ही ठरविलं की अभयारण्यमहून म्हैसूरला जाऊन एक दिवस आरामात काढून मंगळवारी शिवसमुद्रमूचा कार्यक्रम करायचा. 'आराम' हे आप्पांचं ध्येयवाक्य होतं.

म्हैसूर सरकार टूरिझमतर्फे दहा दिवसांसाठी घेतलेल्या मोटारीचा दर मैलाला बारा आणि आणे डिटेन्शन चार्ज. रोज पंधरा रुपये म्हणजे मोटारीचा खर्च सहाशे मैलांचा रु. ६०३–००. ठिकठिकाणी हॉटेलं, टिप्स, चहाफराळ रु. ५७०, म्हणजे एकंदर खर्च रु. ११७३–०० एवढा येणार होता. पण आप्पांनी ठरविलं होतं की खर्च केवढाही झाला तरी हरकत नाही, सफर बिलकुल आरामशीर झाली पाहिजे. ही सफर याहून कमी खर्चात करण्यासारखी आहे. म्हैसूर, म्हैसूरच्या आसपासची प्रेक्षणीय स्थळं, वृंदावन, शिवसमुद्रम् या सर्व ठिकाणांमध्ये आरामशीर बसेस जा ये करीत असतात. शिवाय विलायती, महागड्या हॉटेलांपेक्षा साऊथ इंडियन हॉटेलं मला अधिक स्वच्छ आणि सोयीची वाटतात.

मंगळवारी सकाळी आठ वाजता आम्ही म्हैसूर सोडलं आणि शिवसमुद्रम्च्या रस्त्यानं आमची मोटार धावू लागली. तेव्हा माझ्या मनाची अवस्था मोठी चमत्कारिक झाली होती. आमच्या सहलीचा हा अखेरचा दिवस होता. गेल्या चौदा दिवसांत अत्यंत आनंदाचे क्षण आले तसे गेले होते. शिवसमुद्रम्च्या दर्शनाचा अनुभव आमचं जीवन काही काल उजळून असाच अंतर्धान पावणार होता. ज्याचा अखेर शेवट व्हायचा त्याची सुरुवात तरी कशाला ? . . . .

परंतु एकेक मैल मागे पडू लागला आणि शिवसमुद्रम्च्या परिसरात गाडी शिरली तसा हा खिन्न विचार केव्हाच मनावेगळा झाला आणि उरली फक्त उत्सुकता आणि अधीरता !

शिवसमुद्रमचा प्रवास फारसा सुखाचा वाटला नाही. आजूबाजूला हिरवी वनश्री नाही, मळे नाहीत की केळीची बनं नाहीत. रस्ता खडबडीत, धुळीनं भरलेला. अशा रस्त्यानं सत्तावन्न मैल

प्रवास केल्यावर शिवसमुद्रम् अशी पाटी दिसली. परंतु गावाच्या खुणा अगर धबधब्याची चाहूल लागेना. जिकडे तिकडे काहीसा ओसाड प्रदेश, नदीच्या कोरड्या पात्रात असतो तसा . . . .

मला मात्र सारखा धबधब्याचा आवाज ऐकू येत होता– ' नायगारा ' चित्रपटात ऐकू येतो तसा !

शेवटी डावीकडे फुटलेल्या आडरस्त्यानं अर्धा मैल गेलो, तेव्हा एका नीटनेटक्या छोट्या गावात आमची मोटार शिरली. समोरच ट्रॅव्हलर्स बंगला दिसला. एखाद्या प्रासादासारखा. तेथील नोकरही मोठे अगत्यशील वाटले. धबधबा पाहून आल्यावर जेवण आटोपून आम्ही बंगलोरला निघणार, असा निरोप ठेवून आम्ही पॉवर हाऊस पाहायला निघालो. शिवसमुद्रम्चं हे पॉवर स्टेशन हिदुस्थानातलं पहिलं हायड्रोइलेक्ट्रिक स्टेशन होय. ते पाहण्यासाठी पॉवर हाऊसच्या कचेरीत जाऊन पास काढावा लागतो. शिवसमुद्रम्च्या धबधब्याचं पाणी कालव्यातून आणून या ठिकाणी मोठमोठ्या स्टोअर टँकमध्ये अडवून ठेवलेलं आहे. हे पाणी पुढं बारा प्रचंड पाइपमधून सहाशे फूट खोल बसवलेल्या जनरेटर्समध्ये कोसळतं. पण आता ते स्टोरेज टँकमध्ये अडवलेलं दिसलं ते हिरवंगार ! या तळ्यावरचा नाजूक, पांढऱ्या रंगाचा पूल ओलांडून आम्ही कचेरीत जाऊन पास आणले. ट्रॉलीतून सहाशे फूट खाली पाताळातले ते जनरेटर्स पाहण्यासाठी आम्ही ट्रॉलीपाशी गेलो, पण ट्रॉलीत पाऊल टाकण्याचा धीर मला होईना. . तुम्हांला बादलीत बसवून सहाशे फूट खोल विहिरीत सोडतो, असं कुणी सांगितलं तर बसाल का ? मध्येच रहाटाचा दोर तुटला तर आपली काय अवस्था होईल, याचं भीषण चित्र डोळ्यांसमोर उभं राहून तुम्ही पाय मागे घ्याल, तशीच मी मागे झाले,

पण आप्पा बसले तशी मीही माझा जीवच नव्हे तर सारं वजन मुठीत घेण्याचा प्रयत्न करून ट्रॉलीत बसले. एक घंटा वाजली आणि लोखंडी रहाटाचा पोलादी दोर सुटू लागला. आम्ही हळूहळू खाली जाऊ लागलो.

पॉवर हाऊसवर पाटी होती—

Welcome to one of the earliest Hydro-electric Power stations in Asia.

लहानपणी मला रस्त्याची खडी दडपणारं इंजिन भिववीत असे. नंतर धाडधाड अंगावर येणाऱ्या रेल्वेच्या इंजिनाचा काही दिवस मी धसका घेतला होता. त्यानंतर भीतीमुळं माझी वाचा गेली, ती आता या पॉवर स्टेशनमधीलाते बारा जनरेटर्स पाहून ! जणू बारा आगगाड्यांची इंजिनं धाडधाड चालू होती. आमच्या बरोबरचा मार्गदर्शक ओरडून ओरडून आमच्या कानात यंत्रांची माहिती सांगत होता. पाइपमधून येणारं पाणी जनरेटरमधल्या चाकावर कोसळतं. चाकं फिरतात. वीज उत्पन्न होते, वगैरे वगैरे. परंतु यंत्रांच्या प्रचंड खडखडाटात त्याच्या तोंडाची नुसती वेडीवाकडी हालचाल दिसत होती आणि त्यानं ओरडायचं कारणच नव्हतं. कारण ठिकठिकाणी, हे यंत्र अमूक, याचं काम अमूक, इथं हात लावू नका. जपून.' अशा पाट्या होत्या.

हे पाणी आपलं काम आटोपून पॉवर स्टेशनबाहेर पडे. तेही मोठ्या मस्तीत. परंतु खाली मोकळ्या पात्रात गेल्यावर ते अगदी तीर्थासारखं गरीब दिसू लागतं.

ट्रॉलीत बसून वर जाताना मी मनाशी म्हणत होते, 'दोर तुटू दे नको. अजून धबधबा पाह्यचा आहे–पण धबधबा आहे कुठे ?'

'इथे जवळच' असं मार्गदर्शकाचं उत्तर ऐकलं की मला

बुचकळ्यात पडल्यासारखं होई. गावाबाहेरच्या मोठ्या रस्त्यानं काही फर्लांग गेल्यावर आम्ही एका आडवाटेनं शिरलो आणि धबधब्याचा धीर,गंभीर आवाज आता स्पष्ट ऐकू येऊ लागला. आम्ही आणखी पुढं गेलो आणि शिवसमुद्रम्च्या धबधब्याचं अद्‌भुतरम्य दर्शन घडताच जागच्या जागी थबकलो.

अर्धवर्तुळाकार कड्यावरून तीनशे फूट खाली उडी घेणाऱ्या पाणलोटाची ती शोभा एकटक बघत राहिलं की नाना रूपांनी प्रकट झालेली दिसत होती. कड्यावरून कोसळणाऱ्या पाण-लोटाच्या असंख्य धारा शुभ्र, नाजूक, रेशमी धाग्यांसारख्या भासत होत्या. वाटत होतं, यंत्रावर रेशमी वस्त्र तयार व्हावं, यासाठी या चकचकीत, मुलायम लडीसारख्या खाली सोडल्या आहेत. खाली कातळावर जिथे पाण्याची उडी पडत होती,तिथे जणू हजारो कारंजी फुटली होती आणि उंच उसळत्या धारांतून मोत्यांचं पीक उधळलं जात होतं. खालच्या फत्तरावर झेप घेणाऱ्या पाण्याचा वेग एवढा मोठा की जितक्या उंचीवरून ते खाली पडत होतं, जवळजवळ तितक्याच उंचीवर ते चढत होतं आणि पड-णाऱ्या धारा आणि उसळणाऱ्या धारा यांचा मोठा गंमतीदार दुहेरी पडदा तयार झाला होता आणि या अपूर्व शोभेवर कळस चढविण्यासाठी सूर्यकिरणांनी सप्तरंगी इंद्रधनुष्याची कमान तयार करून ती सारखी अंतराळात अधांतरी धरली होती ! पॉवर हाऊसच्या बारा जनरेटर्समधून बाहेर पाणी संथ वाहत होतं आणि एखाद्या तीर्थासारखं दिसत होतं. ते मी मघाशी पाहिलं होतं. आता धबधब्याच्या काठापर्यंत येणारं वरच्या भागातलं पाणी पाहिलं तो ते देखील एखाद्या तीर्थासारखं संथ, शांत दिसलं आपण केवढी प्रचंड विद्युत्‌शक्ती निर्माण केली, याची त्या पाण्याला

दाद नव्हती आणि त्याचप्रमाणे कड्याखाली कोसळताना तांडव-नृत्याचा केवढा विलास आपल्या हातून घडणार आहे, तेही त्या पाण्याच्या गावी नव्हतं !

मनात असे विचार येत होते, पण आमची एकटक नजर लागली होती. जबलपूरच्या ‘धुआंधार’ची आठवण करून देणाऱ्या त्या प्रपाताकडे. अवघ्या दहा दिवसांपूर्वी ज्या कावेरीच्या पाण्यावर निर्माण करण्यात आलेलं ‘वृंदावन गार्डन’चं स्वप्न मी बघितलं होतं त्याच कावेरीच्या जलक्रीडेचं सौंदर्य आमच्या विहारातल्या अखेरच्या दिवशी आम्ही बघत होतो. वाटत होतं, इथून कधी हलूच नये !

• • •

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वागत
क्रमांक ७०७१
९७३।७१
१०२९२

# सौ. कमला फडके यांचे साहित्य :

## कादंबऱ्या

★ निष्कलंक ! ★ भूल ! ★ बंधन ! ★ जेव्हा रानवारा शीळ घालतो ! ★ धुक्यात हरवलेली वाट ! ★ कशी या त्यजू पदाला ? ★ तीन राग, तीन ताल !

## कथासंग्रह

★ मकरंद ! ★ एक होता राजा ! ★ तेरी चूप मेरी चूप ! ★ गुलमोहर ! ★ तीन उणे दोन = शून्य ! ★ मातीचा हत्ती ! ★ दरवळ ! ★ दुसरा बहर ! ★ तीन चित्तथरारक कथा !

## विनोदी लेखसंग्रह

★ चोरलेल्या चवल्या

## चरित्र

★ थोरांच्या सहचारिणी

## प्रवासवर्णन

★ त्रिवंद्रमची सफर ! ★ उटकमंडची यात्रा !

## नाट्य *( अप्रकाशित )*

★ लतिका झोपली आहे ! ★ गोंधळच गोंधळ !

REFBK-0017217
REFBK-0017217